पुणे, किशोर– वर्ष ५२, अंक ९ वा, सप्टेंबर २०२३, (मासिक)– किंमत रु. ७/– पृष्ठे– ५२
Pune, Kishor- Vol. 52, Issue- 9, September 2023 (Monthly)- Price Rs. 7/- Pages- 52

# किशोर

सप्टेंबर २०२३





# शिक्षक

■ किरण डोंगरदिवे

फळ्यावर काळ्या, खडूची ती रेषा,
आकार भविष्या, देण्यासाठी।।

हातामध्ये छडी, डोळ्यांमध्ये माया,
जीवनाचा पाया, पक्का केला।।

शिकविला तुम्ही, मानवता धर्म,
सचोटीचे कर्म, जपू आम्ही।।

जगण्याचे धडे, भाषा व्यवहार,
गणिताचे सार, सारे दिले।।

मनी पेटविली, विज्ञानाची वात,
अज्ञानाची रात, मिटविली ।।

तुम्हांमुळे आम्हां, लाभले शिक्षण,
अवघे जीवन, धन्य झाले।।

गुरूमुळे सार्थ, जीवनाची गाथा,
टेकवितो माथा, गुरू पुढे।।

संपर्क : ७५८८५६५५७६



**किशोर** सप्टेंबर २०२३, वर्ष ५२ वे, अंक ९ वा, नि. श्रावण-भाद्रपद, शके १९४५




▶ **संपादक :**
कृष्णकुमार पाटील, संचालक,
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

▶ **प्रकाशक :**
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक
निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई

▶ निर्मिती अधिकारी : हेमंत बाबर

▶ अक्षरजुळणी : किशोर विभाग

▶ **कार्यकारी संपादक :**
किरण केंद्रे

▶ वितरण व्यवस्थापक
जालिंदर पाटील

▶ मुखपृष्ठ : चारूहास पंडित
संपर्क : ९८२२०३४५९५

▶ चित्रांकन : चारुहास पंडित, अंबिका करंदीकर,
घनश्याम देशमुख, धनश्री केळकर, राजेंद्र गिरधारी,
अजय विभुते, योगिता धोटे, माईंडइट संवाद,
जैत्र डिजिटल, अमृता ढगे, गणेश ढवळे, मयुरी दिवाळकर




## अंतरंग


- शिक्षक ........ *किरण डोंगरदिवे* ........ ०२
- हैद्राबाद मुक्तीलढा : स्वातंत्र्याच्या पूर्णतेची लढाई ........ *डॉ. सोमनाथ रोडे* ........ ०६
- गुरुजी माझे ........ *अशोक कोळी* ........ ११
- उखाणेबाज रामभरोसे ........ *श्रीकांत बोजेवार* ........ १२
- झोपणारी झाडे ........ *संजय ऐलवाड* ........ १६
- भविष्य आपुल्या हाती ........ *विजय ठाकरे* ........ १९
- गंगरू ........ *समाधान पुजारी* ........ २०
- मुलांनो ........ *प्रा. देवबा पाटील* ........ २३
- ससुल्या आणि कासुल्या ........ *यशवंत सुरोशे* ........ २४
- आम्ही असू वेगळे ........ *संजीवनी बोकील* ........ २६
- बिट्टोची खिडकी ........ *स्मिता बनकर* ........ २८
- चातुर्य ........ *मनोज बोरगावकर* ........ ३०
- सायकलवर टांग ........ *कविता मेहेंदळे* ........ ३३
- जांभळीचा बंगला ........ *वैशाली सूर्यवंशी* ........ ३४
- कुतूहल. ........ *अमित डहाणे* ........ ३८

**बालविभाग**

- भावी आधारस्तंभ ........ ४०
- उमलती प्रतिभा ........ ४२
- चित्रकथा : पाठलाग ........ *घनश्याम देशमुख* ........ ४४
- लाल परी ........ *बाळासाहेब गांगर्डे* ........ ४६

**ENGLISH SECTION**

- The Beauty Of Nature ........ *Sadanand Pundpal* ........ ४७
- A Memorable Vacation ........ *Anushka Bidwe* ........ ४८
- Funny Puzzle ........ *Ghanshyam Deshmukh* ........ ५०





▶ ऑनलाइन वर्गणीकरिता : www.kishor.ebalbharati.in

वार्षिक वर्गणीची रक्कम रु.८०/- मनीऑर्डर अथवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेच्या पुणे शाखेवरील डिमांड ड्राफ्टद्वारे संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ, या नावाने खाली नमूद केलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावी. धनादेश स्वीकारला जाणार नाही.

**पत्रव्यवहाराचा पत्ता: कार्यकारी संपादक, किशोर, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,** सेनापती बापट मार्ग, पुणे- ४११००४, संपादकीय : ०२०- २५७१६१०७, वितरण व तक्रार : ०२०-२५७१६२४४, ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in




**■ जयश्री अनिल पाटील**

दर महिन्याला वाट बघतात किशोरची
मुलांसाठी खास असलेल्या मासिकाची

विचारतात सतत, आला का किशोर ?
पावसासाठी जसा की तहानलेला चकोर

किशोर मासिक हातात पडताच मुले
खुश होऊन नाचतात सारी आनंदाने

रंगीत रंगीत किशोरची सुबक बांधणी
आकर्षक मुखपृष्ठ अन् रेखीव मांडणी

किशोरचे पहा कसे देखणे अंतरंग
ज्ञानाचे मनामध्ये उमटतात तरंग

कथा त्यातील साऱ्या गुंतवून टाकतात
कवितांचे आशय मनामध्ये रुजतात

हास्य कथा कवितांची वेगळीच गोडी
सोडविण्यात दंग होतात काही जण कोडी

ज्ञान-विज्ञान-चातुर्याचा आहे खजिना
माहिती, साहस, संस्काराचा नजराणा

वेधक, सुंदर, मोहक त्यातील चित्र
किशोरच खरा झालाय मुलांचा मित्र

किशोर वाचल्याशिवाय चैन नाही पडत
मग मोबाईल हातात मुळीच नाही आवडत.

संपर्क : ८२७५५९२०४४









हितगूज

# ध्यास सर्वोत्तमाचा



किशोर मित्रांनो,

'जीवनात पुढे जाऊन तुला काय व्हायचं आहे?' असा प्रश्न अनेकदा विचारला जातो. तुम्हांलाही असा प्रश्न विचारला गेला असेलच. त्याचे तुमच्या परीने तुम्ही उत्तरही दिले असणार. कुणी डॉक्टर, इंजिनिअर, शास्त्रज्ञ, शिक्षक, पायलट असे सांगितले असणार. याचे एक उत्तर असेही असू शकते की, मी काय होईल ते माहीत नाही. पण जे काही करीन ते मात्र 'सर्वोत्तम' करीन. कारण काय करायचे यापेक्षा 'सर्वोत्तम' करण्याचा विचार महत्त्वाचा आहे. पण सर्वोत्तम होणे सोपे आहे? अजिबात नाही. त्यासाठी अपार कष्ट, जिद्द आणि ध्येयनिष्ठा हवी असते. हे जर आपण करू शकलो तर त्या सर्वोत्तमापर्यंत आपल्याला नक्कीच पोहोचता येईल. जन्माला येणारी प्रत्येक व्यक्ती इतरांपेक्षा वेगळी असते. त्याअर्थी आपण एकमेवाद्वितीय असतो. म्हणजे आपल्यासारखं इतर कुणीच नसतं. प्रत्येक व्यक्तीची शारीरिक जडणघडण, रंग, रूप; भावनिक आणि मानसिक कौशल्य इतरांपेक्षा निराळं असतं. निसर्गानेच आपल्याला तसे घडवलं आहे. मग निसर्गाचं एवढं मोठं वरदान लाभलेले आपण कुठल्याही परिस्थितीत निराश होण्याचं किंवा हार मानण्याचं काहीच कारण नाही. प्रत्येक माणसात एवढी क्षमता नक्कीच असते की, तो हव्या त्या उंचीपर्यंत स्वत:ला नेऊ शकतो. म्हणजे काय, तर आपणच आपल्या क्षमता ओळखायला हव्यात. आपल्याकडे असलेल्या क्षमतांचा आणि कौशल्यांचा पुरेपूर वापर करून ध्येय गाठणे म्हणजे सर्वोत्तम होणं. प्रत्येकाला आपले स्वतंत्र स्थान निर्माण व्हावे असे वाटतं. गर्दीत हरवून जाणं कुणालाच आवडत नाही. एक गोष्ट लक्षात ठेवा, आपण सगळे एकाच शर्यतीचा भाग आहोत असं वाटत असले तरी प्रत्येकाची शर्यत वेगळी आहे आणि गंमत म्हणजे आपली शर्यत आपल्या स्वत:शीच आहे. सर्वोत्तम असणाऱ्या प्रत्येकालाच इथं अमाप संधी उपलब्ध आहेत. फक्त स्वत:वरचा विश्वास कधीच ढळू देऊ नका. परिस्थितीला दोष देऊन हार मानू नका. प्रत्येक क्षणात आनंद मानायला शिका. निसर्गाने प्रत्येकालाच वेगवेगळ्या क्षमता आणि कौशल्य दिलेलं आहे. माझ्यात अशी कोणती निराळी गोष्ट आहे हे ओळखा. एकदा का तुम्ही मनाला सकारात्मक विचार करायची सवय लावली की, तुम्हांला अडथळ्याऐवजी प्रत्येक ठिकाणी संधी दिसतील. ही सकारात्मकता तुम्हांला 'सर्वोत्तम' होण्यापर्यंत घेऊन जाईल. यश मिळवण्यासाठी नुसते प्रयत्न नाही तर वृत्ती देखील तितकीच महत्त्वाची आहे. सकारात्मक वृत्ती सर्व यशाचे मूळ आहे. सर्वोत्तम होण्याच्या प्रयत्नात अनेकदा अपयशही येऊ शकते. मात्र प्रत्येक अपयशातून धडा घेत जिद्दीने पुढे वाटचाल सुरू ठेवणे हीच 'सर्वोत्तम' होण्याची अट आहे. तुमच्या प्रयत्नांना खूप साऱ्या शुभेच्छा...

**– किरण केंद्रे**
कार्यकारी संपादक

डॉ. सोमनाथ रोडे

# हैद्राबाद मुक्तीलढा
## स्वातंत्र्याच्या पूर्णतेची लढाई

**मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे हे सुवर्णमहोत्सवी वर्ष. हैद्राबाद मुक्ती लढ्याद्वारे १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाडा निजामाच्या तावडीतून मुक्त झाला. निजामाच्या अन्यायी राजवटीविरोधात समाजातील सर्व स्तरांमधील स्वातंत्र्य योद्ध्यांच्या बहुमोल योगदानातून जो लोकलढा उभा राहिला तो कसा उभा राहिला आणि मराठवाडा निजामशाहीच्या जोखडातून कसा मुक्त झाला ते आपण या लेखाच्या माध्यमातून जाणून घेऊ या...**

मुलांनो, आपला भारत देश १५ ऑगस्ट १९४७ ला स्वतंत्र झाला. मागच्या वर्षीच आपल्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाले. म्हणून आपण देशभर मोठ्या आनंद व उत्साहात अमृत महोत्सव साजरा केला. भारत स्वतंत्र होत असताना भारतात जवळपास ६०० संस्थाने होती. संस्थाने म्हणजे छोटी छोटी राज्ये. परंतु देश स्वतंत्र होत असताना ह्या छोट्या राज्यांनी भारतात विलीन होण्याचा निर्णय घेतला. हैद्राबाद, काश्मीर व जुनागढ ही संस्थाने मात्र मागे राहिली. त्यातही जुनागढ व काश्मीरच्या प्रमुखांनी अखेरच्या क्षणी भारतात सामील होण्याचा निर्णय घेतला. परंतु हैद्राबादचे संस्थान भारतात सामील होण्यास राजी नव्हते. तिथे निजाम मीर-उस्मान-अली हा प्रमुख होता. पूर्वी हे संस्थान म्हणजे मोगल साम्राज्याचा एक सुभा म्हणजे विभाग होता. भारतात जेव्हा मुघलांची सत्ता कमकुवत झाली, त्या वेळेस मोघलांचा एक सुभेदार निजाम-उल-मुल्क हा हैदराबाद संस्थानचा प्रमुख होता. त्याने १७२४ पासून हे संस्थान आपल्या ताब्यात ठेवले होते. अर्थात हैद्राबादचा निजाम आणि अहमदनगर येथे असलेली निजामशाही राजवट यांचा कसलाच संबंध नव्हता. शेवटी ही निजामशाही मोगल सम्राट शहाजहानने आपल्या ताब्यात घेतली होती. हैद्राबाद संस्थानावर निजामाचे सुमारे २२४ वर्षे राज्य



होते. हे घराणे 'आसफजाही' या नावाने ओळखले जात असे. २२४ वर्षांत हैद्राबाद संस्थानावर वंशपरंपरेने सात निजामांनी राज्य केले. हैद्राबाद संस्थानात तेलगु भाषिक आठ जिल्हे, मराठी भाषिक पाच जिल्हे आणि कन्नड भाषिक तीन जिल्हे होते. असे सोळा जिल्ह्यांचे त्रिभाषिक राज्य म्हणजेच हैद्राबाद संस्थान होय.

शेवटचा निजाम मीर-उस्मान-अली हा १९११ ते १९४८ या काळात सत्तेवर होता. भारतात सामील होण्यासाठी त्याने एक वर्षाचा कालावधी मागून घेतला. परंतु तो नंतर मात्र टाळाटाळ करू लागला. हैद्राबाद संस्थान हे एक स्वतंत्र राष्ट्र व्हावे, अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती. संस्थानात ८० टक्के प्रजा हिंदू, ११ टक्के मुस्लिम तर ९ टक्के इतर लोक होते. त्या वेळेची संस्थानाची लोकसंख्या १ कोटी ६३ लाख ३८ हजार ५३४ एवढी होती. हैद्राबाद संस्थानाचे एकूण क्षेत्रफळ ८२,६९८ चौ. मैल म्हणजे २,११,७०६.८८ चौ. किलोमीटर एवढे होते. संस्थानात १६ जिल्हे, ४ सुभे, १०० तालुके व २२,५०० खेडी होती; तर भाषिकदृष्ट्या तेलुगु, मराठी, कन्नड व उर्दू या चार भाषांचे लोक होते.

मुलांनो, १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला तरी, हैद्राबाद संस्थानात आसफजाही घराण्याचा चंद्रकोर चिन्ह असलेला हिरवा झेंडा फडकत होता. संस्थानात ज्यांनी तिरंगा झेंडा फडकवण्याचा प्रयत्न केला त्यांच्यावर निजाम सरकारने कडक कारवाई केली. भौगोलिकदृष्ट्या हैद्राबाद संस्थान भारताच्या उदरस्थानी होते. भारताच्या पोटातच एक 'अल्सर' असल्यासारखे संस्थानाचे स्वरूप होते. संस्थानातील प्रजेला भारतीय संघराज्यात सामील होण्याची ओढ होती. त्यासाठी संस्थानातील त्रिभाषिक जनतेने निकराचा लढा दिला. हैद्राबाद स्वातंत्र्यलढ्याचा कालखंड साधारणपणे दहा-बारा वर्षांचा आहे. या दहा-बारा वर्षांच्या कालखंडात निजामाशी बऱ्याच राजकीय वाटाघाटी झाल्या. शेवट 'पोलीस ॲक्शन'ने झाला. मधल्या काळात हिंदू महासभा, आर्य समाज, स्टेट काँग्रेस यांच्या वतीने नि:शस्त्र प्रतिकाराचे सत्याग्रह झाले. शाळा - कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी 'वंदे मातरम आंदोलन' केले. तिन्ही प्रांतिक परिषदांनी मौलिक योगदान दिले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित बांधवांना या आंदोलनात सक्रिय सहभाग घेण्याची प्रेरणा दिली. ब्रिटिश भारतात झालेल्या 'छोडो भारत - चले जाव' चळवळीचे प्रतिसाद हैद्राबादमध्येही उमटले. सारा बंदीचे आंदोलन झाले. शिंदीची झाडे तोडण्यासाठी जंगल सत्याग्रह झाले. भारत स्वतंत्र झाला त्या दिवशी तिरंगी ध्वज फडकवणार यासाठी सत्याग्रह झाले.

रझाकार नावाचे निमलष्करी दल निजामाने बाळगले होते. त्यांच्या अत्याचाराला तोंड देण्यासाठी आणि स्वाभिमान रक्षण करण्यासाठी ग्रामीण भागात अनेक सशस्त्र प्रतिकार दले स्थापन झाली. त्यांना मदत करण्यासाठी संस्थानाच्या सरहद्दीवर, भारताच्या हद्दीत जागोजागी कॅम्प स्थापन करण्यात आले. १९४२ च्या चळवळीत सातारा जिल्ह्यात पत्री सरकार स्थापन झाले होते. त्याप्रमाणे औरंगाबाद जिल्ह्यात गोवर्धन सराळा आणि उस्मानाबाद (धाराशिव) जिल्ह्यातील ६५ गावांमध्ये (मुक्तापूर स्वराज्य) प्रजासत्ताकही स्थापन झाले होते. कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखाली विशेषत: तेलंगणा विभागात शेतकऱ्यांना वर्गीय पातळीवर संघटित करण्याचेही प्रयत्न झाले. चाफेकर बंधू, भगतसिंगांप्रमाणे क्रांतिकारक प्रयत्नही झाले. नारायण पवार यांनी निजामाच्या गाडीवर बॉम्ब टाकून त्याला ठार मारण्याचा प्रयत्न केला. सशस्त्र व नि:शस्त्र लढ्यासाठी पैसे कमी पडतात, म्हणून क्रांतिकारक युवकांनी उमरी (जि. नांदेड) येथील बँक लुटल्याचेही उदाहरण ज्ञात आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या साठ वर्षांत जे जे झाले ते ते सर्व आंदोलनाचे प्रकार कमी- जास्त प्रमाणात हैद्राबाद स्वातंत्र्यलढ्यात झाले. हे या मुक्तीसंग्रामाचे पहिले ठळक वैशिष्ट्य म्हणून नमूद करता येईल. भारतीय स्वातंत्र्यलढ्याप्रमाणे हैद्राबाद स्वातंत्र्यलढ्यात पुरुषांच्या बरोबरीने आशाताई वाघमारे, दगडाबाई शेळके, गोदावरीबाई टेके, सुशीलाबाई दिवाण, गीताबाई चारठाणकर, शांताबाई कोटेचा, कावेरीबाई बोधनकर, त्रिवेणीबाई पाटील आदी महिलांनी सक्रिय भाग


घेतला. सुशिक्षित, अशिक्षित, वरिष्ठ जातीय, बहुजन समाजातील, श्रीमंत-गरीब अशा थरांतील स्वातंत्र्यवीरांनी आपले बहुमोल योगदान हैद्राबाद स्वातंत्र्यलढ्यात दिले. शोएब-उल्ला-खान, मोहीब हुसेन, ॲड. सिराजुल तिरमजीसारखे काही मुस्लिमही पुरोगामी, लोकशाही व स्वातंत्र्यवादी होते. हैद्राबाद स्वातंत्र्यलढ्याचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे या स्वातंत्र्यसंग्रामात सर्वसामान्य जनतेचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता. म्हणून या लढ्याला एका लोकलढ्याचे विराट स्वरूप प्राप्त झाले होते.

सशस्त्र आंदोलनात वीस हजार ध्येयधुंद, प्राणार्पणाची तयारी ठेवणाऱ्या कार्यकर्त्यांनी भाग घेतला. १९३८ ते १९४८ या अकरा वर्षांत ४० ते ५० हजार लोकांचा आंदोलनात प्रत्यक्ष सहभाग होता. १९४७ ते १९४८ म्हणजे अखेरच्या स्वातंत्र्यलढ्याच्या टप्प्यात वीस हजारापेक्षा अधिक लोक निजाम सरकारच्या तुरुंगात होते. तीस हजार कार्यकर्ते भूमिगत होऊन कार्य करीत होते. मुलांनो! भारतीय स्वातंत्र्याची चळवळ झाली ती हैद्राबादच्या चळवळी इतकी गुंतागुंतीची व क्लिष्ट नव्हती. ती मुख्यतः राजकीय पातळीवरची चळवळ होती. इंग्रजांनी धार्मिक, भाषिक व सांस्कृतिक शोषण केले नव्हते. भारतीय संघराज्यात विलीन व्हायचे, प्रातिनिधिक, जबाबदार सरकार मिळाले पाहिजे; राजेशाही, घराणेशाही, सरंजामशाही व जहागिरदारी संपली पाहिजे व लोकशाही स्थापन झाली पाहिजे, हैद्राबाद स्वातंत्र्यलढ्याच्या नेतृत्वाची ही उद्दिष्टे होती.

या लढ्याचे खरे शिल्पकार स्वामी रामानंद तीर्थ हे होते. त्यांचे मूळ नाव व्यंकटेश भगवानराव खेडगीकर होय. त्यांचा पिंड बालपणापासूनच साधुत्वाकडे झुकणारा होता. त्यांचे मूळ गाव कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील खेडगी. म्हणून ते खेडगीकर या आडनावाने परिचित. वडील सिंदगी येथे शिक्षक असताना व्यंकटेशला ध्यानस्थ साधूचे दर्शन घडले. त्यांच्यासमोर हा बालक उभा होता. साधूचे त्याच्याकडे ध्यान जाताच साधूने विचारले, "बाळ तुला काय हवंय?" तेव्हा व्यंकटेश म्हणाला, "मला तुमच्यासारखं व्हायचंय." व्यंकटेशचे शिक्षण सिंदगी, सोलापूर, अमळनेर येथे झाले होते. प्रसिद्ध कामगार नेते ना. म. जोशी यांच्याकडे स्वीय सहाय्यक म्हणून काम करीत असताना त्यांना पक्षाघाताचा आजार झाला. त्यामुळे त्यांनी ना. म. जोशींकडील नोकरी सोडली. तेव्हा उस्मानाबाद जिल्ह्यात हिप्परगा (नरसोबाचे) येथे देशमुख बंधूंनी राष्ट्रीय शाळा सुरू केली होती. त्या शाळेत व्यंकटेश खेडगीकर मुख्याध्यापक म्हणून रुजू झाले. इथेच त्यांचा हैद्राबाद संस्थानशी संबंध आला. मुख्याध्यापक असतानाच व्यंकटेश खेडगीकर यांनी लखनौच्या रामतीर्थ मठाचे नारायण स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली १४ जानेवारी १९३२ रोजी दीक्षा घेतली. त्यानंतर व्यंकटेश भगवानराव खेडगीकर यांचे 'स्वामी रामानंद तीर्थ' म्हणून नामकरण झाले. तसा व्यंकटेश यांचा पिंड राष्ट्रीयवृत्तीचा नि साधुत्वाचा होता. १९२० मध्ये लोकमान्य टिळकांच्या निधनामुळे व्यंकटेश हे खिन्न व बेचैन झाले होते. तेव्हा ते सोलापूरच्या नॉर्थकोट हायस्कूलमध्ये शिक्षण घेत होते. खरं, म्हणजे बेचैनी तरुणांच्या जिवंतपणाचा स्थायीभाव असतो. रामानंद तीर्थ यांनी स्वतःच त्या प्रसंगाचे वर्णन खालीलप्रमाणे आपल्या आठवणीत नोंदवून ठेवले आहे.

"मी कंबर तलावाच्या पायरीवर बसलो. तळ्याचे पाणी पायापर्यंत होते. मी खूप रडलो. किती वेळ ते आठवत नाही. बाहेरच्या जगाचा मला विसर पडला होता. मी अगदी शून्यमनस्क बसलो. न कोणता विचार, न कसली जाणीव. संध्याकाळ झाली. सूर्य अस्तास चालला होता. एकदम मी उभा राहिलो. दोन हाताच्या ओंजळीत तळ्यातील पाणी घेतले आणि मावळत्या सूर्याला मी अर्घ्य दिले. अर्घ्य देताना मी स्वतःशी पुटपुटलो. या क्षणापासून माझे पुढील जीवन मी पूर्णपणे मातृभूमीच्या सेवेसाठी अर्पण करील. सर्व संग परित्याग करून मी आजन्म ब्रह्मचारी राहीन. अर्घ्य दिले आणि मी ध्यानमग्न झालो."

स्वामीजी संकल्प आणि सिद्धीमध्ये किमान अंतर ठेवणारे कृतीशील नेते होते. 'बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले' या संत उक्तीप्रमाणे जीवन जगणारे



ते संन्यस्त कर्मयोगी होते. हिप्परग्याच्या शाळेनंतर ते अंबाजोगाई येथील योगेश्वरी नूतन विद्यालयाचे मुख्याध्यापक झाले. तेथूनच १९३८ मध्ये ते महाराष्ट्र परिषदेचे काम पाहण्यासाठी हैद्राबादला गेले. संस्थानात राहणारी प्रजा व त्यांच्या जीवनमरणाच्या प्रश्नांशी स्वामीजींचा संबंध येत गेला. तेलगु, मराठी, कन्नड आणि उर्दू या चार भाषांत विभागलेल्या जनतेला एका सूत्रात बांधण्याचे असामान्य कार्य स्वामीजींसारखा संन्यस्त कर्मयोगी असल्यामुळेच पूर्णत्वाला जाऊ शकले. स्वामीजी जेवढे शांत व मृदू स्वभावाचे वाटतात तेवढेच ते कडक व कणखर वृत्तीचे असल्याचे जाणवते. स्वामीजींनी निजामाला एवढे बजावले होते की, "तुमचे काम तुम्ही करा व माझे काम मला करू द्या. तुमच्यापाशी दमनाची, दडपशाहीची व जुलूम, जबरदस्तीची विपुल साधने आहेत. तर माझ्यापाशी मोडेन पण वाकणार नाही, अशी निष्ठा आहे. तुमच्याकडे सत्ता आहे तर माझ्याकडे सत्य आहे. वर्तमान तुमचा असेल तर भविष्य माझे आहे." त्याग व अपरिग्रहाचे प्रतीक म्हणून भगवी वस्त्रे धारण करणारा हा नेता होता. हैद्राबादच्या जनतेच्या इतिहासाच्या पानोपानी आपल्या व्यक्तीमत्त्वाचे, चारित्र्याचे व धीरोदात्ततेचे दर्शन घडवणारे कुशल नेतृत्व होते. हैद्राबाद स्वातंत्र्यलढ्याचे अधिनायक स्वामीजी हे बहुविध सद्‌गुणांचे मूर्तिमंत प्रतीक होते. मुलांनो! खरं पाहता स्वामीजी कर्नाटकात जन्मले. महाराष्ट्रात त्यांच्या कर्तृत्वाला प्रारंभ झाला आणि उमेदीची राजकीय हयात त्यांनी तेलंगणात घालवली.

स्वामीजींच्या निष्ठावान सहकाऱ्यांमध्ये बाबासाहेब परांजपे, गोविंदभाई श्रॉफ, माणिकचंद पहाडे, दिगंबरराव बिंदू, पुरुषोत्तमराव चपळगावकर, शामराव बोधनकर, विनायकराव चारठाणकर, स. कृ. वैशंपायन, देवीसिंह चौहान, आ. कृ. वाघमारे, नागनाथराव परांजपे, शंकरराव चव्हाण, अनंत भालेराव, जगन्नाथराव चंद्रकी, डॉ. जे. एस. मेलकोटे, मुरलीधरराव कामतीकर, वि. पां. देऊळगावकर, जनार्दनराव देसाई (कर्नाटक), जे. केशवराव, कोमरगिरी नारायणराव, कोदाटी नारायणराव, माडपाटी रामचंद्रराव, पी. व्ही. नरसिंहराव, के. व्ही. नरसिंहराव, एम. एस. राजलिंगम (तेलंगणा) यासारख्या निष्ठावान व ध्येयवादी कार्यकर्त्यांचा समावेश होता.

तसेच आर्य समाजी कार्यकर्ते वेदप्रकाश (गुंजोटी, उमरगा), शामलाल (उदगीर), विरभद्रजी आर्य (औराद शहाजानी, लातूर) व स्टेट काँग्रेसचे कार्यकर्ते बहिर्जी शिंदे (वापटी – वसमत), गोविंद पानसरे (अर्जापूर, नांदेड), जनार्दन मामा (जालना), वसंत राक्षसभुवनकर (बीड), जयवंत पाटील (हदगाव, नांदेड), ॲड. श्रीधर वर्तक (अपसिंगा, उस्मानाबाद) शोएब-उल्ला-खान, महमंद इस्माईल व गावोगावच्या वीर हुतात्म्यांच्या बलिदानातून हैदराबादचे स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे. या सर्वांच्या त्यागाचे व बलिदानाचे मोल लक्षात घेऊन मुलांनी राष्ट्रीयत्वाचे मूल्य जोपासले पाहिजे.

भारत सरकार व निजाम यांच्यात झालेल्या जैसे थे करारामुळे भारतीय संघराज्य आणि हैद्राबाद संस्थान यांच्यात परस्पर सहकार्याचे वातावरण निर्माण होईल, अशी आशा होती. परंतु ती निरर्थक ठरली. करारातील तरतुदींचा गैरवापर करणे, अनेक तरतुदींचा भंग करणे असे उद्योग निजाम सरकारने सुरू केले होते. कासीम रझवीने रझाकारांची संख्या व बळ वाढवून सर्वत्र निघृण अत्याचार सुरू केले होते. या संदर्भात भारत सरकारच्या गव्हर्नर जनरलने ३१ ऑगस्ट १९४८ रोजी पत्र पाठवून रझाकार संघटनेवर बंदी घालावी. तसेच जनतेला भयमुक्त करावे, असे सुचवले होते. परंतु निजामाने या पत्राचे बेजबाबदारपणे उत्तर दिले. त्यामुळे ९ सप्टेंबर १९४८ रोजी भारत सरकारने केंद्रीय गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली सैन्यदलाला हैद्राबादवर आक्रमण करण्याचे आदेश दिले. त्याप्रमाणे १३ सप्टेंबर १९४८ रोजी पहाटे चार वाजता संस्थाना विरुद्ध 'पोलीस ॲक्शन' झाली.

१३ सप्टेंबर रोजी भारतीय फौजा पाच वेगवेगळ्या ठिकाणांहून हैद्राबाद संस्थानामध्ये घुसल्या. संस्थानावरील लढाईची ही योजना 'ऑपरेशन पोलो' या सांकेतिक नावाने ओळखली जाते. लेफ्टनंट जनरल राजेंद्रसिंह हे या योजनेचे प्रमुख होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मेजर जनरल जयंत चौधरी, मेजर जनरल डी. एस. ब्रार, मेजर जनरल ए. ए. रूद्र, ब्रिगेडीयर शिवदत्त सिंह आणि एअर व्हाईस मार्शल मुखर्जी यांनी ही योजना राबवली व पूर्णत्वाला नेली. १३ ते १७ सप्टेंबर १९४८ पर्यंत सर्व आघाड्यांवर घमासान लढाई झाली. भारतीय सैन्याने आत्मविश्वासाने कारवाई केल्यामुळे १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाने आपली शरणागती घोषित केली. निजामी फौजेचे प्रमुख जनरल अल इद्रिस यांनी फौजांना युद्ध थांबवण्याची विनंती केली.

दिल्लीच्या लाल किल्ल्यावर हिरव्या रंगाचा चंद्रकोर असलेला ध्वज फडकावण्याचे कासीम रझवीचे स्वप्न अक्षरशः धुळीत मिळाले. स्वामीजींचे अजोड नेतृत्व, त्यांच्या निष्ठावान सहकारी हुतात्म्यांचे बलिदान आणि हजारो स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान यांमुळे हा असामान्य विजय प्राप्त झाला. हैद्राबाद संस्थानच्या विलीनीकरणामुळे भारतीय स्वातंत्र्याची खऱ्या अर्थाने पूर्तता झाली. तेव्हा मुलांनो, संस्थानातील जनतेला १५ ऑगस्ट ऐवजी १७ सप्टेंबर १९४८ ला स्वातंत्र्य मिळाले. म्हणून संस्थानात राहणारी जनता १५ ऑगस्ट, २६ जानेवारी सोबतच १७ सप्टेंबर हा दिवस प्रतिवर्षी का साजरा करते, हे आता तुमच्या लक्षात आले असेल! आता तर हे वर्ष हैद्राबाद मुक्तीसंग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष म्हणून उत्साहाने साजरे केले जात आहे.

**संपर्क : ७५१७९८५६९०**

# गुरुजी माझे



■ अशोक कोळी





ज्ञानाचा सागर
मायेचा आगर
सर्वाहून थोर
गुरुजी माझे

स्वप्नांना साकार
देतात आकार
जीवनाला माझ्या
गुरुजी माझे



दाऊनिया वाट
आयुष्याचा घाट
करती सुंदर
गुरुजी माझे



कष्टाने अपार
थोर शिल्पकार
घडविती पिढ्या
गुरुजी माझे

उंचावती मान
तिरंग्याची शान
घडविती राष्ट्र
गुरुजी माझे

संपर्क : ९४२१५६८४२७





श्रीकांत बोजेवार

भाग – ९

# उखाणेबाज रामभरोसे

रामभरोसेनं आता निरुपद्रवी थापा मारणंही बंद केलं. एक एक अवगुण राम्याला धडा शिकवत होता आणि त्या अवगुणापासून त्याला मुक्तही करत होता. या दरम्यान त्याचं मूळ काम, म्हणजे निवाडा देण्याचं काम मात्र त्यानं नीट सांभाळलं होतं. इतरांच्या भानगडीत नाक खुपसण्याची त्याची उपजत हौस त्यामुळे पूर्ण होत होती. राजाचा सेवक म्हणून चांगला मोबदलाही मिळत होता. बुद्धी तल्लख असल्यानं तो निवाडेही चांगले देत होता. मध्यंतरी त्याला आपली राज्याचा मुख्य न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाल्याचं जे खूळ लागलं होतं तेही आता थांबलं होतं. प्रत्येक अवगुण त्याला एक धडा शिकवून जात होता. राम्या आता फारच सुधारला होता. राजाच्या दरबारात त्याच्या निवाड्यांचं कौतुक होऊ लागलं. कधी तरी त्याला दरबारात बोलावून सल्लाही घेतला जाऊ लागला. त्याला शाही पगडी बहाल करण्यात आली आणि ती घालून तो आता रोज

निवाडा द्यायला बसू लागला. राम्याच्या आईला वाटलं की आता राम्या नीट राहील. त्याचं आता लग्न लावून द्यायला पाहिजे. तिनं नातेवाईकांकडे निरोप पोहोचवले आणि राम्यासाठी चांगली स्थळं सुचवण्याची विनंती केली.

अशाच एका निरोपातून शेजारच्या गावचे एक गृहस्थ आपल्या मुलीचं स्थळ घेऊन राम्याकडे आले. राम्या शाही पगडी घालून ऐटीत बसला होता. पाहुण्यानं येण्याचं कारण सांगितलं आणि आपली मुलगी कशी रूपवान, गुणवान आणि चतुर आहे याचं वर्णन केलं. राम्यानं ते ऐकलं आणि म्हणाला, “मी आधी मुलीच्या बापाच्या चातुर्याची परीक्षा घेतो आणि मग मुलीच्या. मंजूर आहे का तुम्हांला?” मुलीच्या बापाला हे थोडं विचित्र वाटलं, परंतु त्यानं होकार दिला. राम्यानं थोडा विचार केला आणि म्हणाला, “मी तुम्हाला एक उखाणा घालतो, त्याचं उत्तर द्या.” पाहुण्यानं मान डोलावली. आपलं खासगी काम करताना शाही पगडी नको म्हणून राम्यानं डोक्यावरची पगडी काढून ठेवली आणि मुलीच्या बापाला उखाणा घातला.

**‘अग्नी येता आभाळाकडे धाव घेते,**
**अग्नी जाता अंगावर पांघरूण घेते.’**

मुलीच्या बापानं खूप विचार केला परंतु त्याला काही उत्तर सांगता येईना. राम्या म्हणाला, “मला काही घाई नाही. मी दिवसभर इथे निवाडा देत बसणार आहे. तुम्ही विचार करत बसा.” राम्याच्या आईनं घरून दुपारी जेवण पाठवलं, तेव्हा राम्यानं पाहुण्यांसमोर पोटभर जेवण केलं, परंतु पाहुण्याला काही विचारलं नाही. पाहुणा बिचारा उपाशीपोटी



## बेभरवशा रामभरोसे

विचार करत बसला. संध्याकाळ झाली, राम्याची घरी जायची वेळ झाली, तेव्हा पाहुणा म्हणाला, “माझी पोरगी हुशार आहे, तिला विचारतो मी या प्रश्नाचं उत्तर.” राम्या म्हणाला, “ज्या मुलीच्या बापाला एवढ्या साधा उखाणा उकलता येत नाही, त्याच्या मुलीशी मी लग्नं करणार नाही.” मुलीचा बाप म्हणाला, “अहो, पण तुम्हाला संसार तर माझ्या मुलीसोबत करायचा आहे. माझी हुशारी पाहून काय करणार तुम्ही?” त्यावर राम्या तुच्छतेने त्याच्याकडे पाहात म्हणाला, “माझ्या डोक्यावरची पगडी बघा. राजाचा सेवक आहे मी. राजाच्या सेवकाचा सासरा एवढा मूर्ख असून कसं चालेल?”

मुलीचा बाप बिचारा अपमानित होऊन तिथून परत फिरला. एक तर दिवसभर उपाशी होता तो. जवळच्या एका टपरीवर गरमागरम भजी तळली जात होती. तिथं जाऊन त्यानं आधी भजी खाल्ली आणि मग गावाकडे परत निघाला. राम्या मात्र जाम खुशीत होता. आपल्याला ऐन वेळेवर किती छान उखाणा सुचला म्हणून तो स्वतःचीच पाठ थोपटून घेत होता.

दुसऱ्या दिवशी आणखी एक पाहुणा राम्याला भेटायला आला. राम्याला वाटलं हा कुणीतरी



तंटा घेऊन आला असेल. राम्यानं विचारलं, “कोणासोबत वाद आहे तुमचा?” पाहुणा म्हणाला, “वाद कसला, हट्ट आहे माझा.”

“कसला हट्ट?”

“तुम्ही माझ्या मुलीशी विवाह करावा असा हट्ट आहे माझा. माझी मुलगी लाखात एक आहे. गावात तिच्या तोडीची एकही सुंदर मुलगी नाही. तिच्या हुशारीचं कौतुक तर सगळेच करतात. तुम्हांला तिच्यापेक्षा देखणी आणि बुद्धिमान मुलगी शोधूनही सापडणार नाही बघा.”

राम्याला मनातल्या मनात हसू आलं आणि तो म्हणाला, “बघतोच याची हुशारी आता.” तो पाहुण्याला म्हणाला, “तुमची मुलगी जर एवढी हुशार असेल तर मग तुम्हीही तेवढेच हुशार असाल याची मला खात्री आहे.” पाहुणा संकोचून म्हणाला, “आता मीच कसं सांगणार माझ्या तोंडानं स्वतःचं कौतुक?”

“तुम्ही नकाच सांगू. मी तुम्हांला एक उखाणा घालतो, त्याचं उत्तर द्या तुम्ही म्हणजे तुमचं बुद्धीचातुर्य मला आपोआपच कळेल.”

पाहुणा म्हणाला, “मी जर उत्तर दिलं तर तुम्ही माझ्या मुलीला पाहायला आमच्या घरी याल का?”

“अर्थातच. नक्कीच येणार.” राम्या म्हणाला.

“मग विचारा मला उखाणा.” पाहुणा उत्सुकतेनं ऐकू लागला. राम्यानं डोक्यावरची पगडी काढून

ठेवली आणि मुलीच्या बापाला उखाणा घातला.

**'अग्नी येता आभाळाकडे धाव घेते,**
**अग्नी जाता अंगावर पांघरूण घेते.'**

पाहुणा विचारात पडला. राम्या या पाहुण्यालाही तेच म्हणाला, "मला काही घाई नाही आहे. मी दिवसभर इथे निवाडा देत बसणार आहे. तुम्ही विचार करत बसा." त्या दिवशीही राम्याच्या आईनं घरून दुपारी जेवण पाठवलं. राम्यानं पाहुण्यासमोरच पळसाच्या पत्रावळीवर सुग्रास अन्न वाढून घेतलं. अगदी पोटाला तडस लागेल एवढं भरपेट जेवण केलं. पाहुण्याला मात्र जेवता का वगैरे काहीच विचारलं नाही. राम्याच्या पत्रावळीकडे पाहत पाहत पाहुणा बिचारा उपाशीपोटी उखाण्यावर विचार करत बसला. संध्याकाळ झाली, राम्याची घरी जायची वेळ झाली. राम्या पाहुण्याला म्हणाला, "काय पाव्हणं? नाही सापडत ना उत्तर? तुमच्यावरून तुमच्या पोरीची परीक्षा करायची झाली तर ती मठ्ठच म्हटली पाहिजे. खूप सोपा उखाणा घातला होता मी." मुलीचा बाप म्हणाला, "खरंच माझा पोरगी हुशार आहे. तुम्ही एकदा तिला प्रत्यक्ष पहा आणि तिला विचारा हाच उखाणा. कशी पटकन् उत्तर देईल बघा ती." त्यावर राम्यानं कालच्याचसारखं तुच्छतेने मुलीच्या बापाकडे पाहिलं आणि म्हणाला, "माझ्या डोक्यावरची पगडी बघा. राजाचा सेवक आहे मी. राजाच्या सेवकाचा सासरा एवढा मूर्ख असून कसं चालेल?"

मुलीचा बाप बिचारा खाली मान घालून तिथून परत फिरला. दिवसभर पोटात अन्नाचा कण नव्हता त्यामुळे त्याची हालत खराब झाली होती. जवळच्या एका टपरीवर गरमागरम समोसे तळले जात होते. तिथं जाऊन त्यानं आधी दोन समोसे खाल्ले आणि मग गावाकडे परत निघाला. राम्या तर आज जास्त खुशीत होता. आपल्याला किती छान उखाणा सुचला, कोणीच त्याचं उत्तर देऊ शकत नाही म्हणून तो स्वतःचीच पाठ थोपटून घेत होता.

राम्याच्या आईनं नातेवाईकांना, विवाह जमविण्यात पुढाकार घेणाऱ्या पंडितांना, ओळखीच्यांना सगळ्यांनाच सांगून ठेवलं होतं. त्यामुळे रोज एका तरी मुलीचा बाप राम्याकडे येत असे. राम्या त्याला आधी वेगवेगळे प्रश्न विचारून भंडावून सोडत असे आणि सरतेशेवटी तो उखाणा घालून त्याला नामोहरम करत असे.

एक दिवस एक प्रकांड पंडित राम्याकडे त्यांच्या कन्येच्या लग्नाचा प्रस्ताव घेऊन आले. राम्या नेहमीप्रमाणे पगडी घालून गुर्मीत बसलेला होता. पंडित राम्याला म्हणाले, "तुम्ही राजाचे सेवक आहात, माझी कन्याही संस्कृत शिकलेली आणि अतिशय हुशार आहे. तुमचा दोघांचा जोडा फार छान दिसेल." राम्या म्हणाला, "तुम्ही आधी माझ्या एका उखाण्याचं उत्तर द्या, मग मी तुमच्या प्रस्तावाचा विचार करतो." पंडित म्हणाला, "विचारा की, त्यात काय एवढं?"

राम्यानं डोक्यावरची पगडी काढून ठेवली आणि मुलीच्या बापाला उखाणा घातला.

**'अग्नी येता आभाळाकडे धाव घेते,**
**अग्नी जाता अंगावर पांघरूण घेते.'**

प्रकांड पंडित हसले. नीट मांडी घालून बसले.

(प्रकांड पंडितानं राम्याच्या उखाण्याचं उत्तर दिलं का? पुढे काय झालं? राम्याच्या अहंकाराचा फुगा कसा फुटला? या प्रश्नांची उत्तरं बेभरवशा रामभरोसे या कथामालिकेच्या पुढील भागात)

**संपर्क : ९८९२४१९२६७**

संजय ऐलवाड

# झोपणारी झाड



पिऊला झाडांचे खूप आकर्षण. एखादे झाड दिसले की ती आनंदून जाते. रोपटे असेल, तर अगदी मायेने पानांवरून हात फिरवते. तिच्या लाडेल स्पर्शाने पानांनाही गुदगुल्या होत असाव्यात. चित्रकलेच्या वहीतही झाडाचीच चित्रं. पिऊची झाडांविषयीची आवड तिच्या बाबांच्या लक्षात आली. म्हणून एका रविवारी तिचे बाबा म्हणाले.

"पिऊ बाळा, गॅलरीत ठेवण्यासाठी रोपटे आणण्याचा विचार करतोय, सोबत येतेस का?"

रोपट्याचे नाव ऐकून पिऊ आनंदून गेली. भांड्याचा मांडलेला खेळ सोडून ती बाबाकडे गेली. तिच्या चेहऱ्यावर आनंद लपत नव्हता. ती हसतच म्हणाली.

"बाबा, खरंच रोपटे आणायचे आहे."

बाबा म्हणाले, "हो बाळा, अगदी खरे खरे रोपटे आणायचे आहे. मग तू सोबत येणार ना?"

पिऊने हसऱ्या चेहऱ्याने मान डोलावून होकार दिला. लागलीच ती बेडरूममध्ये जाऊन तयार झाली. तिच्या चेहऱ्यावरचा आनंद काही लपत नव्हता. तिने काळ्या-भुरकट केसांना पिन लावली होती. तिचे पाणीदार डोळे आनंदले होते. गोबऱ्या गालावरचे हसू लपत नव्हते. तिचे हे रूप पाहून गालगुच्ची घेण्याचा मोह बाबांना आवरला नाही. बाबांनी गालाला हात लावताच ती घराबाहेर पळाली. थेट पार्किंगला जाऊन थांबली. तिच्या मागोमाग बाबाही निघाले. घरापासून दोन किमी अंतरावर नर्सरी होती. गाडी नर्सरीसमोर थांबली. तेथील फुलांची आकर्षक रोपटी पाहून पिऊ अधिकच आनंदली. रोपट्यांच्या पाना-फुलांना हात लावण्यास ती उत्सुक होती. फुलांवर फिरणारी लहान पिवळी फुलपाखरे पाहून पिऊचे भानच हरवले. नर्सरीतल्या छोट्या छोट्या रस्त्यांतून फुलपाखरांच्या मागे ती धावत होती. फुलपाखरू फुलावर बसले की, दबक्या पावलाने ती फुलपाखरू धरण्याचा प्रयत्न करत होती. बाबाही तिचा खेळ पहात होते. थोड्या वेळाने बाबाने तिला आवाज दिला.

"बाळा, चला उशीर होतोय. कोणती रोपे घ्यायची ते सांगा."

पिऊने हसऱ्या चेहऱ्याने लाल, पिवळा गुलाब, जास्वंद, मोगऱ्याच्या रोपट्यांकडे बोट दाखवले. बाबाने ती सगळी रोपे घेतली, घरी आले. गॅलरीत रोपे ओळीने ठेवली आणि बाबा म्हणाले,

"पिऊ, आता या रोपांना सांभाळण्याची जबाबदारी तुझी. वेळेवर पाणी घालायचे, नाही तर रोपे सुकतील."

तशी पिऊ म्हणाली, "हो बाबा, मी या रोपांची काळजी घेईन."

त्या दिवशी पिऊ दिवसभर थोड्या थोड्या वेळाने रोपांना पाहत होती. पानांना, फुलांना हात लावत होती. रात्री झोपेपर्यंत तिला रोपे पाहण्याचा मोह आवरत नव्हता. त्यानंतर ती रोज झोपेतून उठल्यानंतर रोपांना पाहत होती. तसेच शाळेतून घरी आल्यावरही थेट रोपांकडे जात होती. दिवस जात होते. रोपे मोठी होत होती. कळ्या येत होत्या, फुले लागत होती. फुलांवर भुंगे व अधूनमधून फुलपाखरेही येत होती. वाऱ्याच्या लहरीवर फुले डोलत होती. पिऊ न विसरता पाणी रोपांना घालत होती. एका दिवशी पिऊचे बाबा हॉलमध्ये झोपले होते. शेजारी पिऊचा भांड्यांचा खेळ सुरू होता. ती स्वत:शीच बडबडत खेळत होती. तसे बाबा म्हणाले, "बाळा, मी झोपतोय, तुझ्या आवाजाने झोपमोड होते. आणि एकदा झोप मोडली की नंतर लवकर झोप लागत नाही. झोप नाही झाली, तर त्याचा आरोग्यावर परिणाम होतो."

त्यानंतर आवाज न करता पिऊ खेळत राहिली. त्याच दिवशी रात्री पिऊ कुंडीतल्या रोपांना हात लावत होती. तशी तिची आई म्हणाली, "बाळा, रात्री रोपांना पानांना, फुलांना हात लावायचा नसतो."

तशी पिऊ म्हणाली, "का गं आई, रात्री रोपांना हात का लावू नये?"

आई म्हणाली, "बाळा, रात्री झाडांना हात लावणे चांगले नसते."

पिऊ काहीच न बोलत रोपांपासून दूर झाली. झोपताना ती आईने रोपांना हात का लावू दिला नाही, याचाच विचार करत होती. सकाळी शाळेतही हाच विचार तिच्या डोक्यात सुरू होता. अचानक तिच्या

चेहऱ्यावर तेज आले. तिला उत्तर सापडले, ती मनात विचार करत होती की, रात्र झाली की आपण झोपतो. मग झाडेही झोपत असावीत. त्यांची पाने अगदी त्यांची बाळं असावीत. मग या बाळांना हात लावल्यावर ती झोपेतून उठत असावीत. मग पुन्हा झोपण्यासाठी ती रोपट्याला त्रास देत असावीत. म्हणूनच आई रात्री रोपट्यांना हात लावू देत नाही. उत्तर सापडल्याने पिऊ आनंदात होती. त्याच दिवशीच्या रात्री रोपांना खूप कळ्या आल्या होत्या. सकाळी त्यांची फुले होणार होती. म्हणून पिऊचे बाबा त्या कळ्यांकडे पाहत उभे होते. सोबत पिऊही होतीच. बाबाने कळीला हात लावण्यासाठी हात पुढे केला. तशी पिऊ म्हणाली, "बाबा, थांबा. कळीला हात लावू नका. रात्री ते झोपतात. हात लावला की त्यांची झोपमोड होईल, आणि तुम्हीच म्हणता ना, एकदा झोपमोड झाली की नंतर लवकर झोप लागत नाही म्हणून."

पिऊच्या बोलण्याचे बाबांना आश्चर्य वाटले. त्यांनी तिला उचलून घेऊन एक पप्पी घेतली. तशी पिऊ पुन्हा म्हणाली, "बाबा झोपलेल्या पाना-फुलांना कधीच उठवायचे नाही. त्यांची झोप झाली नाही, तर त्यांच्याही आरोग्यावर परिणाम होईल. मग रोपे आजारी पडतील. पाने सुकतील, कळ्या येणार नाहीत, फुले फुलणार नाहीत. रोप म्हणजे बाळ. या बाळाची काळजी घेतली पाहिजे."

पिऊची बडबड सुरू होती. बाबा तिचे बोलणे ऐकतच राहिले. तसे बाबा म्हणाले, 'हो बाळा, आता मलाही कळले, रात्री झाडे झोपतात. त्यांची झोपमोड करायची नाही.' बाबांना पिऊचे आश्चर्य वाटले, खरेच रात्री झाडे झोपतात? झोपत असतील, तर आपला त्यांना त्रास होतो? असा विचार करतच ते झोपले. त्यानंतर रोजच रात्री झोपण्यापूर्वी पिऊ चोरपावलांनी रोपांना पाही. घरात येऊन हळू आवाजात रोपे झोपली असे आई बाबांना सांगे. त्यानंतर आवाज न करता ते सगळे झोपत. पिऊच्या झोपणाऱ्या झाडांमुळे घरातील टीव्हीचा आवाज कमी झाला होता. पिऊ, आई-बाबांच्या बोलण्यावर मर्यादा आल्या होत्या. झोपणाऱ्या झाडांमुळे घरात रात्री शांतता पसरत होती.

**संपर्क : ९८३४४००४८१**



# भावपूर्ण आदरांजली

बालभारतीच्या गणित विषय समितीच्या अध्यक्षा म्हणून श्रीमती मंगला नारळीकर यांनी अनेक वर्षे काम केले. उच्चविद्याविभूषित असलेल्या मंगलाताईंनी अगदी पहिली-दुसरी पासूनची पाठ्यपुस्तके तयार करण्यात पुढाकार घेतला. त्यांचा अभ्यास आणि तळमळीतून मुलांना गणिताची गोडी लावणारी सुंदर पाठ्यपुस्तके तयार झाली. पदव्युत्तर मुलांना शिकवतानाच शालेय स्तरावरील कायम अवघड वाटणाऱ्या गणित विषयाकडे विद्यार्थी कसे आकर्षित होतील यासाठी त्या सतत प्रयोग करत राहिल्या. गणित विषयाची दर्जेदार पाठ्यपुस्तके तयार होण्यात त्यांचा फार मोलाचा वाटा आहे. त्यांच्या बहुश्रुत विद्‌वत्तेचा राज्यातील लाखो विद्यार्थ्यांना लाभ झाला. त्यांच्या जाण्याने पाठ्यपुस्तक मंडळाचा हक्काचा मार्गदर्शक हरवला आहे. बालभारती आणि किशोर मासिकासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले. मंगलाताईंना बालभारती परिवाराच्यावतीने विनम्र आदरांजली.

# भविष्य आपुल्या हाती

■ विजय ठाकरे

नव्या दिशेचे, नव्या उषेचे, गीत सूर हे गाती
या चिमुकल्या मुलांचे आहे, भविष्य आपुल्या हाती...

नवीन स्वप्ने, नव्या योजना, नवीन आशा, नव्या कल्पना
नवे ज्ञान, विज्ञान आमुच्या, सदा असे सांगाती,
या चिमुकल्या मुलांचे आहे, भविष्य आपुल्या हाती...

विद्यार्थ्यांवर आमुची भक्ती, तीच देवता तीच आरती
पहा उगवली पहाट, सरल्या काळोखाच्या रात्री...
या चिमुकल्या मुलांचे आहे, भविष्य आपुल्या हाती...

भाषा आणिक गणित आहे, शिकण्याचा हो पाया
या विषयांच्या गुणवत्तेसाठी, झिजवू आपुली काया
या चिमुकल्या मुलांचे आहे, भविष्य आपुल्या हाती...

शिक्षक बंधू भगिनी आहेत, राष्ट्राचे निर्माते
निपुण भारत हे महान ध्येय, आता आपुल्या सर्वांचे
या चिमुकल्या मुलांचे आहे, भविष्य आपुल्या हाती...

संपर्क : ९४२००५०४६३



समाधान पुजारी

# गंगरू

आई गंगरूवर प्रचंड चिडली होती. "तुला किती वेळा सांगायचं की, आपला कळप सोडून एकटाच दूर जात जाऊ नकोस म्हणून. अजून थोडा मोठा झालास की हचे ते कर. पण ऐकशील तर शप्पथ. तुला त्या इगलू गरुडाने नाहीतर डिंग्या कुत्र्याने उचलून नेल्यावरच कळेल, मी काय सांगतेय ते."

गंगरू निमूटपणे मान खाली घालून सगळे ऐकत होता. तसेही बाबांनी त्याला सांगितले होते की, आई चिडली की सगळे शांतपणे ऐकून घ्यायचे.

गंगरू हे कांगारूचे पिल्लू होते. नुकतीच त्याने आईच्या पिशवीतून बाहेर पडायला सुरुवात केली होती. त्याच्यासाठी जंगल तसे अजून नवीनच होते. त्यात आज ते एकटेच एका सशाच्या मागे उड्या मारत दूरवर गेले होते. त्याला शोधताना आई-बाबांची प्रचंड उडीमार झाली होती. त्यामुळे त्याला आईचा खूप ओरडा खावा लागला होता. गंगरूचे आई-बाबा रोज त्याला जंगलाची थोडी-थोडी ओळख करून देत होते. जंगलाचे नियम-कायदे समजून घेत गंगरू मोठा होत होता. इगलू नावाचा गरुड

लहान पिल्लांवर झडप घालून त्यांना उचलून घेऊन जायचा; तर डिंग्या कुत्रा त्याच्या साथीदारांसह कांगारूंच्या कळपावर हल्ला करायचा. त्यामुळे कानांचा आणि डोळ्यांचा नीट उपयोग करून घेणंही गंगरू शिकत होता. आईचे शब्द त्याच्या चांगलेच ध्यानात होते त्यामुळे तो दिवसभर तिच्या अवतीभवतीच उड्या मारायचा. थोडा वेळ तो कळपातील इतर पिल्लांसोबत आणि झाडांवरच्या माकडांसोबत खेळायचा. राहिलेला वेळ आईच्या पिशवीत झोपून राहायचा. अधूनमधून हळूच बाहेर डोकवायचा.

आज गंगरू नेहमीप्रमाणे कळपातील पिल्लांसोबत लपाछपी खेळत होता. काही पिल्ले झाडीत, गवतात लपायची तर काही आयांच्या पिशवीत. त्यामुळे एकमेकांना शोधताना त्यांना खूप मज्जा यायची.

डाव गंगरूवर होता. सगळी पिल्ले इकडेतिकडे लपली होती. गंगरू त्याच्या तीक्ष्ण डोळ्यांचा आणि कानांचा उपयोग करत एक एकाला शोधून काढत होता. थोड्याच वेळात गंगरूने सगळ्यांना शोधून काढले पण छोटा चिबी काही केल्या सापडेना. तेवढ्यात गंगरूची नजर दूर झाडावर बसलेल्या इगलूवर गेली. त्याने सगळ्या पिल्लांना सावध केले. पटकन सारी पिल्ले त्यांच्या आयांच्या पिशवीत शिरली.

इगलूकडे बघून तो गवतात लपलेल्या चिबीवर झडप घालायला येतोय हे गंगरूने लगेच ओळखले. चिबीला सावध करणार तोच इगलूने चिबीवर झडप घातली आणि आपल्या पायात पकडून त्याला घेऊन चालला. गंगरूने क्षणाचाही विलंब न करता पटकन उड्या मारत जाऊन चिबीचे पाय पकडले आणि "आई-बाबा" म्हणून जोरात ओरडला. झाल्या प्रकारामुळे इगलूही पुरता गोंधळला. त्यात चिबी आणि गंगरू दोघांच्या वजनामुळे त्याला नीट उडता येईना. तोच गंगरूची आई तिथे आली आणि तिने इगलूच्या तोंडावर जोरात एक ठोसा लावला. इगलूच्या डोळ्यांपुढे चांदण्या चमकल्या. घाबरलेल्या इगलूने चिबी आणि गंगरूला तिथेच सोडले आणि तो दूर उडून गेला.

गंगरूने दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे सगळ्यांनी त्याचं खूप कौतुक केलं. छोट्या पिल्लांनी तर त्याच्याभोवती आनंदाने टणाटण उड्याच मारल्या.

पण झाल्या प्रकारामुळे चिबी पुरता घाबरून गेला होता. इगलूच्या भीतीने त्याने आईच्या पिशवीतून बाहेर येणंच जवळजवळ बंद केलं. तो थोडाच वेळ बाहेर यायचा. आईच्या आजूबाजूला घुटमळायचा आणि लगेच आईच्या पिशवीत शिरायचा. त्याने इतर पिल्लांसोबत खेळणेही बंद केलं. चिबीच्या आईवडलांना त्याची खूप काळजी वाटू लागली. जंगलात राहायचे म्हटले की हे होतच राहणार. त्यामुळे घाबरून कसे चालेल. पण चिबी काहीही ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हता. आपल्या कळपातला छोटा चिबी खेळायला येत नाही म्हणून इतर सगळ्या पिलांनाही खूप वाईट वाटत होतं. चिबी असला की खेळायला अजून जास्त मजा यायची. त्यामुळे सगळ्यांना खेळताना चिबीची खूप आठवण यायची. त्यात गंगरू आणि चिबीची तर खूप गट्टी होती.

काहीही करून चिबीच्या मनातील इगलूची भीती काढून टाकायला पाहिजे. त्यासाठी काय करता येईल याचा विचार गंगरू करत होता. तेवढ्यात त्याची नजर एका जाळ्यावर पडली. एकदा एक जाळं आकाशातून उडत चाललं होतं. नीट

बघितलं तर त्याच्या लक्षात आलं की त्यात खूप सारे पक्षी अडकले होते. त्यांना गंगरूच्या बाबांनी खाली बोलावून घेतले होते. त्या पक्ष्यांनी सांगितले की एका शिकाऱ्याने त्यांना पकडण्यासाठी जाळे लावले होते आणि ते सगळे त्यात अडकले. पण शिकारी परत येण्याआधीच त्यांच्या डोक्यात एक युक्ती आली आणि शिकाऱ्याच्या तावडीतून सुटण्यासाठी त्या सगळ्यांनी जाळ्यासकट उडायला सुरुवात केली. गंगरूच्या बाबांनी त्या सगळ्यांची जाळ्यातून सुटका केली. गंगरूच्या बाबांचे आभार मानून सगळे पक्षी दूर उडून गेले.

जाळं बघून गंगरूच्या डोक्यात एक भन्नाट कल्पना आली होती. त्याने त्याच्या सगळ्या मित्रांना बोलावले आणि सगळ्यांना एक प्लॅन सांगितला. सगळ्यांना तो प्लॅन जाम आवडला.

दुसऱ्या दिवशी ठरल्याप्रमाणे त्यांनी एका झाडावर जाळे लावले. झाडाखाली गंगरू बसला. एकट्या गंगरूला बघून इगलू खूश झाला. त्याने झडप घालायची तयारी केली. गंगरूचे लक्ष नाही हे हेरून इगलूने त्याच्यावर एकदम झेप घातली. तो त्याला पायात पकडणार तेवढ्यात त्याच्या अंगावर झाडावरून जाळे पडले. इगलू जाळ्यात अडकून खाली जमिनीवर पडला. जाळ्यात पूर्णपणे अडकल्यामुळे त्याला उडता येईना. इगलू पुरता गांगरून गेला.

इगलू जाळ्यात अडकलेला बघून सगळे कांगारू टणाटण उड्या मारत त्या झाडाजवळ आले. सगळ्यांनी आनंदाने उड्या मारत टाळ्या वाजवल्या. बाहेर कसला दंगा चाललाय हे बघायला छोट्या चिबीने आईच्या पिशवीतून हळूच डोके वर काढले. 'बघतो तर काय ! समोर इगलू. जाळ्यात अडकलेला!'

इगलू जाळ्यात कसा अडकला हे चिबीला काही कळेना.

गंगरूने त्याच्या माकडमित्रांची मदत घेतली होती. इगलू जसा त्याला पकडायला आला तसं झाडावर लपलेल्या माकडांनी त्याच्या अंगावर जाळं फेकले होते. प्लॅन एकदम सॉलिड यशस्वी झाला होता. जाळ्यात इगलू बरोबर अडकला. चिबी आईच्या पिशवीतून बाहेर आला. तो इगलूजवळ गेला. इगलू जाळ्यातून बाहेर पडण्यासाठी धडपड करत होता. एवढ्या मोठ्या इगलूला आपल्या मित्रांनी जाळ्यात अडकवलेलं बघून चिबीला खूप आनंद झाला. त्याच्या डोळ्यांत पाणी आलं. त्याने आनंदाने गंगरूला जोरात मिठी मारली.

चिबीला इगलूबद्दल वाटणारी भीती आता कुठल्या कुठे पळून गेली होती. चिबीने इगलूला जाळ्यातून सोडायला सांगितले. परत आमच्या पिल्लांना पकडणार नाही असे वचन घेऊन इगलूची जाळ्यातून सुटका केली. घाबरलेला इगलू तो प्रदेश कायमचा सोडून दुसरीकडे निघून गेला.

गंगरूच्या भन्नाट कल्पनेमुळे चिबी परत सगळ्यांसोबत खेळू लागला. गंगरूचे आईबाबा मोठ्या कौतुकाने गंगरूकडे बघत होते. त्यांचा गंगरू सगळ्यांचा लाडका झाला होता. गंगरू टणाटण उड्या मारत आईबाबांजवळ आला. बाबांनी प्रेमाने चाटत त्याला मिठीत घेतले. आईने गंगरूच्या डोक्यावरून हात फिरवला तसा गंगरू पटकन आईच्या पिशवीत शिरला आणि हळूच त्याने पिशवीतून आपले डोके बाहेर काढले. आता दूरवर पसरलेले जंगल त्याच्याकडे बघून मंद स्मित करत होते.

गंगरूला नवीन आव्हानांसाठी खुणावत होते.

**संपर्क : ९९७०७६१९६६**

# मुलांनो

■ प्रा. देवबा पाटील

मुलांनो! बघुनी
तुमचा अभ्यास
करेल जर कुणी
तुमचा द्वेष

तुम्हांस करण्या
नाराज, नाउमेद
तुमचे दोष ते
दाखविती सतत

होऊ नका
मुळी निराश
नियमित करा
तुम्ही अभ्यास

प्रत्येकाची बुद्धी
असते वेगळी
समजशक्ती
निरनिराळी

हे समजायलाही
लागते बुद्धी
निंदकाची बुद्धीच
असते कोती

राजाचा हत्ती
चालतो डौलात
कुत्री त्यावर
असती भुंकत

करण्यास आपली
खूप प्रगती सारी
दुर्लक्ष करावे सदा
निंदा करणाऱ्यांवर

संपर्क :
९४२०७९५३०७



यशवंत सुरोशे



# ससुल्या आणि कासुल्या

छोटा ससुल्या आपल्या बाबांसोबत पाणी प्यायला तलावावर आला होता. पाणी पिता-पिता त्याला काठावर एका छोटंसं कासव दिसलं. ससुल्या त्याच्याकडे पाहतच राहिला. त्याला पाणी प्यायचं भानच राहिलं नाही. त्याच्या बाबाने त्याला विचारले, ''का रे ससुल्या, काय झालं? पाणी आवडलं नाही की काय तुला?''

''बाबा, तो बघा कासुल्या, कसा माझ्याकडं बघतो टुकूटुकू!'' ससुल्या कासुल्यावरची आपली नजर न हटवता बोलत होता.

दोघांच्या बोलण्याचा आवाज ऐकून छोटं कासव पटकन पाण्यात शिरलं आणि दिसेनासं झालं. ससुल्या त्याला बघत राहिला. पण छोटं कासव पुन्हा काठाकडे आलंच नाही.

''चल, पाणी पिऊन घे. आपल्याला घराकडे जायचं आहे.'' ससुल्याकडे बघत बाबा म्हणाला.

मग ससुल्यानं इकडेतिकडे बघितलं. खाली वाकून पाणी प्याला. आपल्या बिळाकडे जाताना तो मागे वळून पुन्हा पुन्हा कासुल्या कोठे दिसतोय का हे पाहत होता.

''बाबा, आपण पुन्हा इथे पाणी प्यायला येऊ.''

''अरे ससुल्या हा तलाव आपल्या बिळापासून दूर आहे. आज हिरवे गवत शोधत-शोधत या बाजूला आलो, म्हणून इथे पाणी प्यायला आलोय.''

बाबा समजून सांगत होता.

''बाबा, मला तो छोटा कासुल्या खूप आवडला आहे.'' ससुल्याने सांगितले.

बाबा ससा हसला नि म्हणाला, ''चल लवकर, तुझी आई वाट पाहत असेल.''

मग दुसऱ्या दिवशी हट्ट करून ससुल्या आपल्या बाबांना घेऊन त्याच तलावावर पाणी प्यायला आला. तेव्हाही त्याला छोटा कासुल्या दिसला. त्याचं कवचाबाहेर डोकं काढणं आणि मान हळुवार फिरवून इकडेतिकडे पाहणं ससुल्याला फार आवडे. पण ससुल्या दिसताच तो पाण्यात शिरे आणि गायब होई.

काही दिवसांनंतर ससुल्या एकटाच हिरवे गवत खात-खात त्या तळ्यापाशी पोहोचला. पाहतो तर काय, कासुल्या पाठीवर ढाल घेतल्याप्रमाणे तळ्याच्या काठावर येऊन ऊन खात बसला होता. ससुल्या लांबूनच पाहत म्हणाला.

''कासुल्या, तू मला आवडतोस. आम्हांला पाहून तू का बरं पाण्यात जाऊन लपतोस? आम्ही गवत खातो. तुला आमच्यापासून काय धोका आहे?'' ससुल्या प्रेमाने बोलत होता.

''ससुल्या, तुला माहीत आहे ना, आपल्या पूर्वजांमध्ये धावण्याची शर्यत लागली होती. ती शर्यत माझे पूर्वज जिंकले होते. तेव्हापासून तुझे पूर्वज आमच्यावर राग धरून बसलेत. उगीच वाद नको म्हणून आम्ही तुमच्याशी संपर्कच ठेवत नाही.'' कासुल्या पहिल्यांदा इतका मोकळेपणाने बोलत होता.

''अरे कासुल्या, यापैकी कोणतीही गोष्ट माझ्या मनात नाही. तू कशाला इतका गैरसमज करून घेतोस?'' ससुल्या पुढे होत म्हणाला.

''तू आता मैत्री करशील नि एक दिवस माझ्याशी शर्यत लावशील. म्हणजे पुन्हा त्याच हकिकती! त्यापेक्षा न बोलणं हेच ठीक!'' कासुल्या अगदी निर्धाराने बोलला.

''कासुल्या, चुकतोयस तू. आपण जंगलात राहणारे प्राणी आहोत. आपल्यावर शत्रूंची नजर असते. शत्रू आणि संकटे यांच्यापासून वाचण्यासाठी आपली दोस्ती असायलाच हवी. आपणच एकमेकांना मदत करायला हवी.'' ससुल्या अगदी मनापासून बोलत होता.

''तुझं म्हणणं पटतयं मला. तू ही आवडतोस मला. तुझा शुभ्र रंग, गुबगुबीत अंग नि गुंजांसारखे डोळे बघत राहावे असे वाटते.'' कासुल्यानं मोकळेपणानं बोलत होता.

''कासुल्या, आपण शर्यत लावायचीच नाही. त्यापेक्षा तू मला पाण्यात पोहायला शिकव, मी तुला जमिनीवर उड्या मारत कसं वेगाने पळायचं ते शिकवेन.'' ससुल्याने आपल्या मनातील कल्पना सांगितली.

''मस्त कल्पना आहे तुझी! मलाही जमिनीवर हळूहळू चालायचा खूप कंटाळा येतो. शत्रूची भीती वाटते. उड्या मारत भरभर पळता आले तर किती मजा येईल ना!'' कासुल्या उत्साह आल्याप्रमाणे बोलत होता.

''माझ्या आजोबांना पोहता येत नव्हते. त्यामुळे ते पाण्यात वाहून गेले. त्यांची हकीकत ऐकल्यापासून मी पोहायला शिकण्याचा निश्चय केला आहे.'' ससुल्यानं आपल्या मनातील इच्छा बोलून दाखवली.

''आपण एकमेकांशी शर्यत लावण्यापेक्षा आपल्या दोघांना जे काही काम करता येते ते एकमेकांना शिकवू. तू जंगलातल्या गमती सांग. मी तुला पाण्यातल्या जमती सांगेन.'' कासुल्याही आनंदाने बोलत होता.

''प्रॉमिस!'' ससुल्या.

''प्रॉमिस टू'' कासुल्या.

तेव्हापासून ससुल्या आणि कासुल्या यांची गट्टी जमली. दोघे सोबतीने मोकळ्या माळावर फिरतात. काहींना वाटते, त्यांची धावण्याची शर्यत लागली असावी. पण ते दोघे सोबतीने चालतात. एकमेकांना गमतीजमती सांगतात नि दिलेलं प्रॉमिस पाळतात.

**संपर्क : ९६२३१६९४०३**

# आम्ही असू वेगळे!

■ संजीवनी बोकील

तशाच हिरव्या वेलींवरची जरा निराळी फुले
निर्मळ हृदये, चेहरे हसरे, तरी निराळी मुले ।।ध्रु।।

देवाकडच्या वाटणीत जरि, कमी मिळाले काही
तक्रारीचा सूरही नाही, खंत जराशी नाही
व्यवहाराचे हिशेब त्याने, कुठे आम्हां शिकविले
निर्मळ हृदये, चेहरे हसरे, तरी निराळी मुले ।।१।।



म्हणून ईर्ष्या, द्वेष अशाची लागण आम्हां नाही
मला- तुला अन् माझे- तुमचे भाषा ठाऊक नाही
प्रेमाने जो हाक मारतो त्याला म्हटले अपुले
निर्मळ हृदये, चेहरे हसरे, तरी निराळी मुले ।।2।।

रस्त्याने जाताना आम्ही हात आईचा धरुनी
वळून बघता, खिदळता तुम्ही किती मनापासुनी
असतो अमुच्या तंद्रित आम्ही, काय आम्हांला कळे
निर्मळ हृदये, चेहरे हसरे, तरी निराळी मुले ।।3।।

कधी समारंभाला आम्ही नटुनी थटुनी येतो
का आईचा चेहरा तेव्हा बावरलेला असतो
या प्रश्नाचे उत्तर सांगा, आम्हांस ते ना मिळे
निर्मळ हृदये, चेहरे हसरे, तरी निराळी मुले ।।४।।

जगात तुमच्या असेल बंदी, आम्ही असू वेगळे
स्वागत तुमचे, दार आमुच्या विश्वाचे परी खुले
एकवार या, निर्मळ बनुनी, जातील काळीजफुले
निर्मळ हृदये, चेहरे हसरे, तरी निराळी मुले ।।५।।

संपर्क : ९८५०६६०६००

स्मिता बनकर

दुपारी बिट्टो शाळेतून घरी आली. दप्तर जागेवर ठेवले. कपडे बदलले. हातपाय धुतले आणि धावतच आपल्या खिडकीत जाऊन बसली. बिट्टोच्या अंगणात समोरच चाफ्याचे मोठे झाड होते. त्या झाडावर सकाळी नऊ ते अकरा, दुपारी एक ते तीन या वेळेत काही पक्षी येऊन बसत. त्यात दयाळ, बुलबुल, कोकिळा, चश्मेवाला आणि कधीकधी खारुताईपण येत असे.

खिडकीतून त्यांना बघत बसणे हा बिट्टोचा रोजचा दिनक्रम होता. पक्षी येण्याच्या वेळेत ती फक्त खिडकीतच असे. जेवण, अभ्यास पक्षी गेल्यानंतरच. शनिवार आणि रविवार हे दोन दिवस बिट्टोची मस्त चंगळच असे. पूर्णवेळ ती पक्षी निरीक्षण करीत असे. चाफ्याच्या झाडाला लागूनच भिंत होती. त्यावर पक्ष्यांसाठी लहान लाल मडक्यात पाणी आणि पसरट भांड्यात धान्य बिट्टो नियमित ठेवत असे. त्यामुळे साहजिकच पक्ष्यांचाही तिथे सारखा वावर असे. पक्ष्यांसाठी बिट्टो चाफ्याचे झाड, फांद्या कापू देत नसे. पावसाळ्यात वाढलेल्या चाफ्याच्या फांद्या बिट्टोला विचारूनच कापल्या जात असत.

दयाळ, बुलबुल झाडावर बसत. मडक्यातील पाणी पित, दाणे टिपत आणि मडक्यातच बुडबुड अंघोळही उरकून घेत. नंतर झाडावर बसून

# बिट्टोची खिडकी



ओले अंग झडकत. इकडून तिकडे उडत अंग झटकताना त्यांना एकटक बघत राहणे बिट्टोला खूप आवडायचे. त्यांच्या या मोहक हालचाली बघण्यात खरं तर... बिट्टोचा खूप वेळ जाई... पण त्यातून मिळणारा आनंद काही निराळाच होता...! कधीतरी येणारी खारूताई... पसरट भांड्यातील दाणे खात असे. आपली झुबकेदार शेपटी वळवून दोन पायांवर बसून दाणे खाताना खूप छान दिसत असे. चार पाच पक्षी एकत्र येऊन बडबड सुरू करत. त्यांचा गलका खूपच हवाहवासा वाटे.

एकदा काय झाले...!

बिट्टो घरात होती. बाहेर पक्ष्यांचा खूप मोठा आवाज येत होता. "काय झाले असेल...?" बिट्टो धावतच खिडकीत आली. पहाते तर काय...! आज चाफ्याच्या झाडावर भारद्वाज आला होता. लाल लाल डोळे, गडद तपकिरी रंग त्याला शोभूनही दिसत होता. तो झाडावर बसला, पण त्याचे येऊन बसणे दयाळ आणि बुलबुल या दोघांनाही आवडले नाही. "तू निघून जा. हे झाड आमचे आहे." या आविर्भावात ते भारद्वाजाला तंबी देत होते. त्याच्याशी भांडत होते. भारद्वाज मात्र शांत होता. दयाळ आणि बुलबुलाचा सारखा हल्ला सुरू होता. "तू निघून जा. आमच्या झाडावर तू थांबू नकोस... जा चालता हो इथून...!" असंच काहीसं सांगत... इकडून तिकडे उडत होते. फांदीवर वर-खाली बसत होते. मोठ्ठ्याने आरडाओरडा करत होते. बिट्टो खिडकीतून हे सारं बघत होती. "आता पुढे काय होईल?" याची कल्पना करत होती.

शांत भारद्वाज इकडेतिकडे बघत होता. त्यांची बडबड ऐकत होता. ज्या फांदीवर दयाळ बसला होता ती फांदी अचानक मोडली, वाकली. बेसावध दयाळ पडणार, उडण्याचा विचार करणार तोच भारद्वाजाने ती फांदी आपल्या अंगावर तोलून धरली. दयाळ सावरला. भारद्वाजाने मदत केली हे त्याच्या लक्षात आले आणि तो शांत झाला. बुलबुलनेही झालेला प्रकार बघितला. आता तोही शांत झाला. अचानक चाफ्याच्या झाडावर शांतता पसरली. सगळे गप्प बसले. आता हळूहळू दयाळ, बुलबुल, भारद्वाज एकमेकांना समजून घेत होते. ओळख करून घेत होते. नवीन मित्र म्हणून एकमेकांचा स्वीकार करत होते. तेवढ्यात चश्मेवाला आला. कोकिळाही आली. दयाळाने झालेला प्रकार त्यांना सांगितला आणि भारद्वाज आपला नवीन मित्र म्हणून ओळख करून दिली. "पण तुझे चुकले दयाळा. बुलबुल तू तरी समजवायचे. तूपण भांडण करण्यासाठी सामील झालास. झाड कधी कोणाल येऊ नका असे म्हणाले आहे का?" कोकीळ दोघांना समजावत म्हणाली. सगळ्यांना पटले. "आता तुम्ही भारद्वाजाची माफी मागा." चश्मेवाल्याने सुचवले. आपले चुकले याची जाणीव दयाळ आणि बुलबुलला झाली. आपली चूक त्यांनी कबूल केली. भारद्वाजकडे माफी मागितली. झाडावर पुन्हा बडबड सुरू झाली. सगळं व्यवस्थित झालेले बघून बिट्टोपण खूश झाली.

चाफ्याच्या झाडावर आता भारद्वाजही येऊ लागला. मित्रांशी गप्पा मारू लागला. त्यांचे येणे-जाणे सुरू होते. त्यांच्या गोड गप्पा ऐकतांना छान वाटायच्या. खिडकीत बसून बिट्टो चाफ्याचे झाड, त्यावरील पक्ष्यांचा किलबिलाट, बहरलेल्या चाफ्याच्या फुलांचा वातावरणात पसरलेला घमघमाट या सगळ्यांचा आनंद रोजच घेत होती. सगळेच आनंदात होते.

**संपर्क : ९८५०२३५८१३**



मनोज बोरगावकर

# चातुर्य

आजच्या धकाधकीच्या जीवनात आपल्याला टिकून राहायचे असेल तर चातुर्य अंगी बाळगले पाहिजे. इमानदारी आणि प्रामाणिकपणाबरोबर जगण्यातले चातुर्य हे गुण आत्मसात केले पाहिजे. ते कसे ते येशू ख्रिस्त नेहमी सांगत असलेल्या एका सुंदर कथेतून तुमच्या लक्षात येईल. ती कथा अशी...

एक खूप खूप श्रीमंत माणूस होता. त्याला तीन मुले होती. तिघेही तशी गुणी मुले होती. त्याला त्यांच्यात संपत्तीची काही वाटणी करून, त्यांच्यापैकी एकाला आपल्या उर्वरित संपत्तीचे वारसदार नेमायचे होते. तिन्ही मुले कर्तृत्ववान होती. पण या तिघांपैकी अधिक चतुर कोण याचा निर्णय त्याला घेता येत नव्हता. बरे वयानुसार सगळ्यात मोठ्या मुलाला वारसदार नेमावे तर ती मुले तिळी (एकाच वेळी जन्मलेली) होती. त्यामुळे त्याचा निर्णय होत नव्हता. शेवटी त्याने आपल्या गावातल्या वयोवृद्ध फकिराचा सल्ला घेण्याचे ठरवले. तो फकिराच्या झोपडीत गेला. फकीर आपला मस्त धुनी लावून बसला होता. त्या श्रीमंत माणसाने त्याला आपली अडचण सांगितली. फकीर हसला आपल्या पायघोळ म्हणजे लांबलचक

# कथा सद्गुणांची

अशा अंगरख्याच्या खिशातून दोन चार मुठी बिया काढल्या आणि त्या श्रीमंत माणसाच्या कानात हळूच काही तरी सांगून त्या बिया त्याला देऊन टाकल्या. तो श्रीमंत माणूस हातात बियांची पोटली आणि कानात फकीराने हळूच सांगितलेली गोष्ट घेऊन आनंदाने घरी आला. घरी आल्यावर तिन्ही मुलांना जवळ बोलावले आणि सांगितले की, “मी तीर्थयात्रेला चाललो आहे. मला परत यायला खूप दिवस लागतील, तोपर्यंत तुम्हांला मी एक छोटीशी जबाबदारी देतो आहे. या काही झाडांफुलांच्या बिया आहेत. या सांभाळा आणि मी तीर्थयात्रेहून परत आल्यावर या मला व्यवस्थित परत करा. मी आता निघतो रे बाबांनो.. पण मी दिलेली ही जबाबदारी मात्र नीट सांभाळाल बरं का!” तिन्ही मुलांमध्ये बियांचे समसमान वाटप करून तो म्हातारा श्रीमंत माणूस तीर्थयात्रेला निघून गेला.

पहिल्या मुलाने विचार केला, “बाबांनी आपल्याला जबाबदारी दिली आहे; आता या बिया आपण नीट सांभाळल्या पाहिजेत. आपली छोटी मुलं ती खेळायला घेतील, जनावरे खाऊन टाकतील किंवा माझ्या हातून कुठे हरवतील तर मी वडलांना काय उत्तर देणार?” या विचाराने त्याने त्या बिया एका मोठ्या तिजोरीत कडीकुलूप लावून ठेवून दिल्या आणि स्वतःशीच खूश झाला, की, ‘आता बाबा आले की आपण ती तिजोरी उघडून बाबांना त्यांची अमानत देऊन टाकू.’ दुसऱ्या मुलाने जरा वेगळा विचार केला, “तिजोरीत बिया ठेवल्या आणि न जाणो त्या सडून गेल्या तर आपण वडलांना काय तोंड दाखवणार.. त्यापेक्षा आपण असे करू त्या बिया विकून टाकू... ते पैसे तसेच ठेवू अन् बाबा आले की त्या पैशांच्या बिया घेऊन त्यांना देऊन टाकू बास.!” दुसऱ्या मुलाने जरा वेगळा विचार केला हे नक्कीच; पण त्याने अगदी योग्यच विचार केला... असे मात्र आपल्याला अजिबातच म्हणता येणार नाही.

आता आपण तिसऱ्या मुलाकडे जाऊ... त्याने मात्र तर्कसंगत विचार केला. त्याने मनाशी विचार केला, “बियांचा मूळ गुणधर्म जमिनीत रुजणे, रुजण्यासाठी त्यांच्या मनात खळबळ चालू असते. त्यांना तसेच ठेवून देणे म्हणजे त्यांच्या रुजण्याच्या शक्यता नाकारणे. तसे योग्य होणार नाही. आपण यांना पेरून टाकू. या फळतील, फुलतील आणि या बियांपासून पुन्हा लाखो-करोडो बिया तयार होतील. बाबांना तीर्थयात्रेहून परत यायला कितीतरी दिवस लागतील. ते परततील तेव्हा या मूठभर बियांच्या बदल्यात कितीतरी थैलाभर बिया आपण त्यांना देऊ. बाबा आनंदून जातील.!” असं तर्कसंगत विचार करून त्याने त्या साऱ्या बिया आपल्या घराच्या मागच्या अंगणात पेरून टाकल्या आणि तो निर्धास्त झाला.

चार पाच वर्षांनंतर त्यांचे वडील थकूनभागून तीर्थयात्रेहून घरी आले. त्यांचा सगळा जीव मात्र बियांतच अडकलेला होता म्हणा ना! आल्या आल्या त्यांनी पहिल्या मुलाला बियांविषयी विचारलं. मुलाने मोठ्या समाधानाने तिजोरी व तिजोरीची चावीही वडलांना देऊन टाकली. वडलांनी दिलेली अमानत आपण कशी सुरक्षित कडी-कुलपात ठेवली आहे याचे समाधान त्याच्या चेहऱ्यावर झळकत होते. वडलांनी तिजोरी उघडली.

आतून सडका घाणेरडा वास येत होता. तीन वर्षे ना हवा, ना पाणी ना सूर्यप्रकाश त्यामुळे त्या बिया सडून गेल्या होत्या. वडील मुलाला म्हणाले, “जी बीजं फळाफुलावीत, त्यांनी सुगंधाची उधळण करावी त्या बियांना तू तिजोरीची धन करून त्याच्या सुगंधाऐवजी त्यांचा दुर्गंधच तू पसरवलास, तू माझी संपत्ती पुढे वाढवू शकणार नाहीस. मी तुला जेवढे दिले तेवढेही तू परत करू शकला नाहीस. वाढवून देण्याची तर बातच सोडा.”

हताश निराश होऊन वडील दुसऱ्या मुलाकडे गेले. त्याने वडील आल्या आल्याच त्या पैशाच्या बिया आणून ठेवल्या होत्या आणि अत्यंत समाधानाने त्याने त्या बिया आपल्या वडलांना दिल्या. त्याला खूप समाधान वाटले. वडील त्या बियांकडे पाहून म्हणाले, “तू पहिल्या मुलापेक्षा हुशार निघालास. पण तुझे विचार परिपूर्ण मात्र अजिबात नाहीत. तू एक घर पुढचा विचार केलास एवढेच. जेवढे दिले. तेवढे तू परत केलेस त्यात चातुर्य असे काही नाही!”

वडील निराश होऊन तिसऱ्या मुलाकडे गेले आणि विचारले, “बिया कुठे आहेत बाळा?” मुलगा वडलांना घराच्या मागच्या अंगणात घेऊन गेला. तिथे सारी बागच फळाफुलांनी बहरली होती. सगळीकडे सुगंध पसरला होता. मुलगा म्हणाला, “बाबा, तुम्ही ज्या बिया देऊन गेला होता त्या तिजोरीत ठेवणे मला प्रशस्त वाटले नाही अन् बाजारात विकणे हेदेखील मनाला पटले नाही. म्हणून मी या बिया मी बागेत पेरून टाकल्या आणि त्यामुळे तुम्ही दिलेल्या बियांपेक्षा शतपटीने अधिक बिया या बागेत उभ्या आहेत.. त्यांचा तुम्ही स्वीकार करावा. मला वाटतं तुम्ही दिलेल्या बियांचे योग्य रक्षण व जतन मी केले आहे.”

वडलांच्या चेहऱ्यावर अपार समाधान पसरले. ते तिसऱ्या मुलाला म्हणाले, “बेटा रुजणे हे बियांचे मर्म. ते तू अगदी बरोबर ओळखलेस. एवढेच नाही तर असलेल्या गोष्टीत भर टाकण्याचे चातुर्यदेखील तुझ्याकडे आहे. तुझी ही करामत पाहून मी खूप आनंदी झालो.!”

त्यांनी त्या मुलाची पाठ थोपटली. मुलांनो, वडलांनी आपल्या संपत्तीचे वारसदार कोणाला नेमले असेल हे तर तुम्ही ओळखलेच असेल हो ना? कारण तुम्ही पहिल्या दोन मुलांसारखे थोडीच आहात.. तुमच्यातही त्या तिसऱ्या मुलाचे चातुर्य आहेच ना?

**संपर्क : ९८६०५६४१५४**

‘किशोर’ हे मासिक मालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक विवेक उत्तम गोसावी यांनी सोहेल एंटरप्रायजेस सर्व्हे नं. ४८, घर पट्टी नं. ४०२, भांडार्ली व्हिलेज, नॅशनल काट्याजवळ, ठाणे ४०० ६१२, येथे छापून ‘बालभारती’, सेनापती बापट रोड, पुणे ४११ ००४ येथे प्रसिद्ध केले. * संपादक– कृष्णकुमार पाटील.

'Kishor' monthly publication is owned by Bureau of Text Book Production and Curriculum Research, Balbharati, Printed and Published by Vivek Uttam Gosavi, Printed at M/s. Sohail Enterprises, S.No. 48, Ghar Patti No. 402, Bhandarli Village, Near National Kata, Thane- 400 612 and Published at Balbharati, Senapati Bapat Road, Pune- 411 004 * Editor : Krishnakumar Patil.

# सायकलवर टांग

■ कविता मेहेंदळे

रविवार असतोच असा, किती तासांचा,
दोस्तांसोबत सायकल सैर जमवतोय
कळत नाहीये, प्रश्न खूपच मोठ्ठाऽऽ
मनासारखं सगळं कसं काय साधतोय?

‘भार तुझ्या या डोक्यावरचा
हलका करून ये केसांचा’,
ऐकून गुपचूप,
नानांची जुनी खडखड सायकल काढतोय....
मनासारखं सगळं कसं काय साधतोय ?

तेवढ्यात आजीची हाक येते कानी
‘राजा तुझ्यासाठी थालीपीठ–लोणी’
नाश्त्यावर मी ताव मारतो
नव्या सायकलवर पँडल मारतोय...
मनासारखं सगळं कसं काय साधतोय ?

नेमका ‘शेरू’ मध्ये धडपडतो
माझं ठोपर पाऽऽर फोडतो
काळजीने बाबा, सायकल उचलतो
अन् मी कधीचा चेन बसवतोय...
मनासारखं सगळं कसं काय साधतोय ?

हातपाय धुऊन मी गृहपाठ करतो
मक्या दोस्त शीळ घालत येतो
नानांशी ‘नेत्र–पल्लवी’ करून मी,
सायकलवर झटकन टांग मारतोय...
मनासारखं सगळं कसं काय साधतोय ?

संपर्क :
९३२६६५७०२७





# जांभळीचा बंगला

वैशाली सूर्यवंशी

"बारक्या... शंकऱ्या... आज दुपारी गाढवं सोनतळ्यात चाराया घेऊन जाऊ. मंग खालच्या अंगाला जाऊन जांभळीच्या बंगल्यातील कैऱ्या पाडू." भिवा बारक्या आणि शंकऱ्याला उत्साहाने सांगत होता. "अय भिव्या, जांभळीच्या बंगल्यात जायचं म्हणजे मरायचंय काय? मी नाय यायचो तुझ्यासंग. "बारक्या जीव आवरून म्हणाला. शंकऱ्या शेळ्यांची औते खुंट्याला बांधत दोघांचं बोलणं ऐकत होता. भिव्याच्या डोक्यात आज काहीतरी खास बेत शिजतोय हे त्याच्या लक्षात आलं. भिवासारखा उचापत्या करणारा पोरगा आख्ख्या रामवाडीत नव्हताच. "भिव्या, जांभळीच्या बंगल्यात काय हाय तुला माहीत नाय का?" शंकऱ्या शेवटी बोललाच. "अरे येड्यावाणी काय करता? आपल्याला थोडं रात्री जायचंय. आपण तिथं दिवसा जाणारे ना." फार समजूत घातल्यावर शंकऱ्या आणि बारक्या भिव्यासोबत यायला तयार झाले.

न्याहारी झाल्यावर गाढवं घेऊन भिवा निघाला तसं त्याच्या बापूनं आवाज दिला, "भिव्या, गाढव चारायला सोनतळ्याकडं जाऊ नगु. काय काय ऐकाया येतया आता." "हा... हा... बापू. तिकडं नाई जाणारं. भवानीच्या टेकडीकडं जातू" म्हणत भिवाने मान डोलावली. गाढवं कुपाटीच्या बाहेर निघाली तशी भिवाला त्याच्या आईने म्हणजे सोन्याईने दारातूनच हाळी मारली, "भिव्या, काई आगाऊपणा करू नगंस. गपगुमान सांजच्याला लवकर घरी ये." हात वर करत त्याने सोन्याईला निश्चिंत राहा म्हणून खुणावलं.

उन्हं वाढली होती. पावसाळ्यात तुडुंब भरलेलं सोनतळ्यातलं पाणी आकसून छोटा डोह तयार झाला होता. तरीही त्यावर रानातल्या पाखरांची, जनावरांची तहान भागत होती. तळ्याकाठी गुलमोहर, नीलमोहर, वड, पिंपळ, चिंच अशा अनेक झाडांची अमाप गर्दी होती. येणारी जाणारी गाईगुरं, वाटसरू तिथं थांबायचे. पण काही दिवसांपासून जांभळीच्या बंगल्यातील भुताच्या बातम्यांनी सोनतळ्याकडे कुणी फिरकत नव्हत. पठ्ठ्या भिवा मात्र बापूचं न ऐकता गाढवं घेऊन सोनतळ्यातच आला होता. गाढवं चरायला सोडली तसं तो बारक्या आणि शंकऱ्याची वाट पाहू लागला.

गावाबाहेर सोनतळ्याच्या जरा खालच्या अंगाला दाट आंब्या-जांभळाच्या झाडीत लपलेला बंगला जांभळीचा बंगला म्हणून ओळखला जाई. बऱ्याच दिवसांपासून तिथं रामाण्णा आणि सायजाक्का हे म्हातारं जोडपं राहत होते. दोघं फार प्रेमळ होती. रामावाडीतील सर्वांशी त्यांचे प्रेमाचे संबंध होते. बंगल्यात आलेल्या मुलांना ती दोघं पोटच्या मुलांप्रमाणे जीव लावत. बागेत पिकलेली जांभूळं, आंबे, फणस, पेरू मुलांना हमखास खायला देत. पण एके दिवशी अचानक रामाण्णा देवाघरी गेला. त्यानंतर सायजाक्काही कुणालाच दिसली नाही. कुणी म्हणे एकटीच कुठेतरी निघून गेली. कुणी म्हणे रामाण्णाच भूत येऊन सायजाक्काला घेऊन गेलं. कुणी म्हणे सायजाक्काने विहिरीत जीव दिला आणि तिचंच भूत बंगल्यात फिरत आहे. पण नक्की काहीच माहीत नव्हतं.

भिवानं जांभळीच्या बंगल्यात नक्की काय आहे हे आज शोधूनच काढायचं ठरवलं होतं. आवस पूनवेच्या रात्री बंगल्यातून येणाऱ्या चित्रविचित्र आवाजांची दहशत गावावर बसली होती. बंगल्यात रात्री बेरात्री लांबून नाचणाऱ्या मशाली दिसत. इतकंच काय रात्रीचं परसाकडे निघालेल्या आप्पानं अगदी दूरवर असलेल्या या बंगल्याकडे नुसती चोरून नजर टाकली तर त्याला उंच पांढरी आकृती दिसली होती. घरी येऊन त्याची दातखिळी बसली आणि पुढचे किती तरी दिवस त्यानं अंथरूण धरलं.

अशा जांभळीच्या बंगल्यात जायचं म्हणजे सोप्पं काम नव्हतंच. बारक्या आणि शंकऱ्या भिवापाशी आले. नेहमीप्रमाणे दोघांच्या कमरेला गलोल होती. बारक्याने कैरीसोबत खायला मिरचीचं तिखट आणि मिठाची पुडी सदऱ्याच्या खिशात टाकून आणली होती.

"अय भिव्या, बंगल्यातून लवकर निघायचं बरंका." बारक्या भिव्याला सांगत होता. हा हा करत भिवा आणि ती दोघं सावधपणे बंगल्याच्या पाठीमागील विस्तीर्ण आवारात शिरली. बंगल्याच्या मागच्या सर्व आंब्यांना कोवळ्या कैऱ्या लगडलेल्या होत्या. बारक्या, शंकऱ्या अजूनही बिचकत होती तर भिव्या अगदी सावध नजरेने कुठं काही दिसत का? म्हणून न्याहाळत होता.

एका झाडाजवळ थांबून बारक्या दबक्या आवाजात म्हणाला, "भिव्या आता म्होरं नही जायचं. याच झाडावरच्या कैऱ्या काढू."

तसा भिवा शंकऱ्याला म्हणाला., "शंकऱ्या, गलोल काढ तुझी."

"नको भो... दगडाच्या आवाजानं एखादं भूत जागं व्हायचं."

"मग आता कैऱ्या कशा पाडायच्या?" भिवा बोलला. बारक्या दबक्या आवाजात भिवावर चिडला "तूच झाडावर चढ."

"बरं, तुम्ही थांबा खाली. मी चढतो वर." असं म्हणून भिवा झरझर झाडावर चढला. कैऱ्या तोडण्यासाठी त्याने बंगल्याकडे जाणारी फांदी निवडली. बंगल्याच्या मागच्या बाजूची खिडकीची काच फुटलेली होती. त्यातून आतील काही दिसतं का? खरंतर हे त्याला बघायचे होते. इतक्या दिवसांपासून घर बंद होते . खिडकीतून पालापाचोळा नक्कीच उडून आत गेला असेल. मात्र खिडकीच्या आत पाहिले तर खोली स्वच्छ दिसत होती. मागच्या अंगणातील माती ओली झालेली होती. खोली कुणी स्वच्छ केली? पाणी कुणी सांडलं? असे प्रश्न त्याच्या मनात येऊ लागले. फांदीवरून थोडं पुढे सरकत तो अजून काही दिसते का? म्हणून न्याहाळत होता. भिवा कैऱ्या तोडायचं सोडून काय बघतोय हे दोघांना कळेना.

भिवा सावध होऊन अजून पुढे सरकला. फुटललेल्या काचेतून त्याला मनुष्याकृती सरकताना दिसली. बंगल्यात भूतबीत काही नसून नक्कीच काहीतरी गडबड आहे हे आता स्पष्ट झाले. तो झरझर खाली उतरला. कैऱ्या न तोडता खाली आलेल्या भिवाकडे बघून दोघे आता दात ओठ खाऊ लागले.

"अय येडा ये का? कैऱ्या नवत्या तोडायच्या मग इत कहाला बलावलं?" म्हणून बारक्या तणतणू लागला. "अरे आपल्या समद्यांना कुणीतरी येडं बनवतंय. इतं बंगल्यात भुतं नाही माणसं राहत्यात. मी पाहिलं एका माणसाला बंगल्यात."

भिवाचं बोलणं ऐकून दोघे गोंधळले. मग भिवाने मग त्यांना हळू आवाजात बंगल्यात काय पाहिलं ते सांगितलं. "शंकऱ्या...बारक्या...खिडकीच्याजवळ जाऊन खोलीत काय आहे? हे पाहू चला. "भिवा बोलला. हो ना करत ते तिघंजण दबक्या पावलांनी खिडकीकडे निघाले. खिडकीजवळ येताच त्यांनी आत पाहिलेलं दृश्य भयंकर होत. हात- पाय- तोंड बांधून ठेवलेली सायजाक्का दिसली. सायजाक्का अगदीच अशक्त झालेली होती. दोन गुंड तिच्यावर ओरडत होती," म्हातारे गुपचूप कागदांवर सह्या कर. हतली मालमत्ता आमच्या नावावर कर. इथं बंगल्यात तुझ्या मदतीला कुणी येणार नाय. लोकांना आम्ही भुताचं भेव घातलंय."

सायाजाक्काने मानेनं नाही म्हणत दिलेला पेन दूर फेकून दिला. सायजाक्काला अशा अवस्थेत पाहून पोरं कळवळली. सायाजाक्काला असं सोडून


जाणं त्यांच्या जीवावर आलं. भिवाने मनाशी काही ठरवलं. पोरांना कानात काही सांगितलं. अंगणातले दगड आवाज न करता हळूच गोळा केले. खिडकीतून गलोलीचा नेम लावत बारक्या, शंकऱ्या त्या गुंडांवर दगडांचा वर्षाव करू लागले. अचानक झालेल्या या हल्ल्यानं गुंड बिथरले. त्यांची डोकी फुटली. रक्त वाहू लागलं. दगडं कोण मारतंय हेही दोघांना कळेना. रामण्णाचं भूत बंगल्यात आलं की काय म्हणून दोघांची बोबडी वळली. तोवर भिवा पुढच्या दाराने आत गेला. जाताना त्याने बारक्याकडून तिखट घेतलं. खोलीत अचानक आलेल्या भिवाला बघून ते गोंधळले. भिवानं शिताफीने दोघांच्या डोळ्यांत तिखट फेकलं. तो पटकन सायजाक्काकडे पळाला. तिच्या दोऱ्या सोडल्या आणि तिला घेऊन बाहेर निघाला.

गुंडांना बसलेल्या मारामुळे आणि तिखटामुळे पळणं शक्यच नव्हतं. पोरं धावत बंगल्याच्या आवाराबाहेर आली. सोबत अशक्त झालेली सायाजाक्का होती. लांबून भिव्याचा बापू काही माणसांसोबत बंगल्याकडे पळत येताना दिसला. गाढवं जांभळीच्या बंगल्याकडे दिसल्याचं कुणीतरी त्याला सांगितलं होतं. घाबराघुबरा होऊन सोबतीला काही माणसं घेऊन तो पोराला शोधण्यासाठी आला होता. समोर पोरं आणि सायजाक्काला पाहून सर्वच जण आश्चर्यचकित झाले. भिवाने बापूला थोडक्यात घडलेला सर्वप्रकार सांगितला. गुंडांना पकडण्यासाठी माणसं आत गेली. ती दोघे सायजाक्काच्या लांबचे नातेवाईक होती. मुलंबाळं नसलेल्या सायजाक्कानं शेतीवाडी, फळबाग आपल्या नावावर करावी म्हणून दोघांनी हा डाव आखला होता. गुंडांना पकडून सरपंचांनी पोलिसांच्या ताब्यात दिलं. पोरांच्या धाडसाचं सर्वत्र कौतुक होऊ लागलं. गावाने पोरांचा सत्कार केला. भिवा, बारक्या, शंकऱ्या गावाचे हिरो झाले.

सायाजाक्काने लेकरांना केव्हाही बंगल्यात येऊ शकता अशी परवानगी दिली. सोनतळ्यात आता पुन्हा गजबज सुरू झाली होती. झाडांच्या गर्दीत गाईगुरं, माणसं रेंगाळू लागली होती.

**संपर्क : ९४०३४०९६७७**

**चारूहास पंडित/ प्रभाकर वाडेकर**



# कुतूहल

अमित डहाणे, ९४२१०५०३८८

'किशोर' मित्रांनो, 'किशोर' ऑगस्ट २०२३ च्या अंकातील कुतूहलची किती उत्तरे तुम्ही बरोबर दिलीत? या अंकात दिलेल्या उत्तरांशी आपण दिलेली उत्तरे ताडून पाहा. तुमच्यासाठी आणखी काही प्रश्न दिले आहेत. स्पर्धकांनी प्रश्नांची उत्तरे कोणाचीही मदत न घेता स्वतंत्रपणे लिहून पाठवण्याचे पथ्य काटेकोरपणे पाळावे. अचूक उत्तरे 'किशोर'कडे २५ सप्टेंबर २०२३ पूर्वी अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावीत.

**१) डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांना कोणत्या वर्षी 'भारतरत्न' हा सर्वोच्च किताब देऊन गौरवण्यात आले?**
१) १९५५ २)१९५८
३)१९५४ ४) १९५२

**२) अलीकडे नुकताच कोणत्या देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना त्यांचा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान केला आहे?**
१) अमेरिका २) फ्रान्स
३) सौदी अरीबिया ४) इजिप्त

**३) महाराष्ट्र राज्य एस.टी.महामंडळाचे सदिच्छा दूत म्हणून कोणाची निवड करण्यात आली आहे?**
१) सचिन तेंडुलकर २) अमृता खानविलकर
३) मकरंद अनासपुरे ४) भाऊ कदम

**४) भारतातील पहिला डिजिटल सायन्स पार्क कोणत्या राज्यात उभारण्यात आला आहे ?**
१) केरळ २) महाराष्ट्र
३) गुजरात ४) कर्नाटक

**५) सध्या चर्चेत असणारे एन. बिरेन सिंह कोणत्या राज्याचे मुख्यमंत्री आहेत?**
१) राजस्थान २) आसाम
३) मणिपूर ४) कर्नाटक

**६) केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने २०२१-२२ या शैक्षणिक वर्षासाठी प्रसिद्ध केलेल्या परफॉर्मन्स ग्रेडिंग इंडेक्स २.० (पीजीआय) अहवालात राज्यात शाळांच्या गुणवत्ता, श्रेणीसंदर्भात कोणत्या जिल्ह्याने अव्वल स्थान प्राप्त केले आहे?**
१) सातारा २) पुणे
३) नागपूर ४) नाशिक

**७) जागतिक पर्यटन दिवस केव्हा साजरा केला जातो?**
१) २५ जानेवारी २) ३ मार्च
३) २७ सप्टेंबर ४) २२ जुलै

**८) भारतातील पहिला संविधान साक्षर जिल्हा म्हणून कोणता जिल्हा घोषित करण्यात आला आहे?**
१) केरळमधील कोल्लम
२) महाराष्ट्रातील पुणे
३) बिहारमधील पूर्णिया
४) मध्य प्रदेशमधील भोपाळ

**९) अंधत्व नियंत्रण धोरण लागू करणारे भारतातील पहिले राज्य कोणते?**
१) राजस्थान २) पंजाब
३) आंध्र प्रदेश ४) तेलंगणा

**१०) कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या वतीने २०२३ चा जनस्थान पुरस्कार कोणाला जाहीर करण्यात आला आहे?**
१) आशा बगे २) रामदास फुटाणे
३) जब्बार पटेल ४) अमोल पालेकर

**११) ९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी कोणाची निवड करण्यात आली आहे?**
१) डॉ.जयंत नारळीकर २) डॉ. रवींद्र शोभणे
३) भारत सासणे ४) न्या. नरेंद्र चपळगावकर

**१२) भारताने कुवेतला हरवून नवव्यांदा (SAFF) ट्रॉफी जिंकली, ही ट्रॉफी कोणत्या खेळाशी संबंधित आहे?**
१) क्रिकेट २) फुटबॉल
३) कबड्डी ४) हॉकी

१३) **भारतात सर्वात जास्त उपमुख्यमंत्री असलेले राज्य कोणते?**

१) महाराष्ट्र  २) आंध्र प्रदेश
३) उत्तर प्रदेश  ४) मेघालय

१४) **जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) भारतासाठी सबीन (Sebine) या लसीची शिफारस कोणत्या रोगाच्या नियंत्रणासाठी केली आहे?**

१) कांजण्या  २) करोना  ३) पोलिओ  ४) रुबेला

१५) **'छंद देई आनंद' नावाच्या काव्यसंग्रहाला बालसाहित्य अकादमीचा २०२३ या वर्षाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. हा काव्यसंग्रह कोणी लिहिला आहे?**

१) एकनाथ आव्हाड
२) विशाखा विश्वनाथ
३) प्रिया महाजन
४) संगीता बर्वे

---

## चित्रकोडे

रचना - घनश्याम देशमुख

### चित्रकोडे ऑगस्ट २०२३ उत्तरे




### कुतूहल ऑगस्ट २०२३ ची उत्तरे

| | | |
|---|---|---|
| १) २ | ६) ४ | ११) ३ |
| २) १ | ७) १ | १२) १ |
| ३) ४ | ८) ३ | १३) ४ |
| ४) १ | ९) १ | १४) १ |
| ५) १ | १०) ४ | १५) ३ |

### कुतूहल जुलै २०२३ – यशस्वी स्पर्धक

कु. प्रसाद गवळी, कु. सुवीर फडे,

### चित्रकोडे जुलै २०२३ – यशस्वी स्पर्धक

- **पुणे** – कु. केयूर मराठे, कु. अनिकेत भवार, कु. प्रणव दाभाडे
- **सातारा** – कु. आरती तरंगे, कु. श्रावणी अहिवळे, कु. सृष्टी राजगे, कु. श्रेया जाधव, कु. समीक्षा करे, कु. श्रुती राजगे, कु. शौर्य सरगडे, कु. सुवीर फडे, कु. ध्रुव जगदाळे, कु. आर्यन जगदाळे,
- **छ. संभाजीनगर** – कु. गौरी लांडगे
- **यवतमाळ** – कु. वेदश्री जयसिंगपुरे
- **जालना** – कु. सरला मगरे
- **सिंधुदुर्ग** – कु. आशिया नावळेकर, कु. रेहान नावळेकर, कु. प्रज्ज्वल पाटील, कु. ओंकार नांदगावकर, कु. रिजा नावळेकर, कु. प्रतिष्ठा नांदगावकर, कु. ओंकार पाटील, कु. नेहा साळुंखे, कु. रिहा नावळेकर, कु. साहिला नावळेकर, कु. प्रांजल नांदगावकर, कु. आरहान साटविलकर, कु. नवाज जैतापकर, कु. एकनाथ गुरव, कु. ईश्वरी कांबळे, कु. राहुल कदम, कु. सुबहान मुजावर, कु. शमिका राऊत, कु. शुभ्रा सावंत, कु. अर्श रमदूल, कु. झिनत शेख, कु. ध्रुव कांदळगांवकर
- **कोल्हापूर** – कु. प्रियांका पाटील, कु. कार्तिका पाटील, कु. कार्तिक पाटील, कु. प्रसाद गवळी
- **रत्नागिरी** – कु. सुमुख केतकर
- **धुळे** – कु. यामिनी गोसावी

माणूस जेव्हा एखादी चांगली गोष्ट करतो, तेव्हा आपण त्याला चांगला म्हणतो. अशा चांगल्या गोष्टी तुम्हीही नक्कीच केल्या असतील.

- तुम्ही दुसऱ्यांबद्दल आपुलकी आणि सहानुभूती दाखवता का?
- जे तुमच्यापेक्षा लहान आणि दुर्बल आहेत त्यांचे रक्षण करता का?
- ज्यांना मदतीची गरज आहे त्यांना मदतीचा हात देऊ करणे म्हणजे चांगुलपणा, असे तुम्हांलाही वाटते ना?

# भावी आधारस्तंभ

मग लागा पाहू लिहायला. त्यासाठी सदर आहे - 'भावी आधारस्तंभ'. तुम्हांला मानधन व वर्षभर अंक मिळेल. तुम्ही केलेल्या सत्कृत्याचा १० ते १५ ओळी मजकूर सुवाच्य अक्षरांत लिहा. तुमचे संपूर्ण नाव, पत्ता (पिनकोड नंबरसह), शाळेचे नाव, वय, इयत्ता इत्यादी तपशील द्या. पासपोर्ट आकाराचा फोटोही लावा. पाकिटावर रु. ५/- चे तिकीट लावून अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवा.



एक दिवस आम्ही मुली लगोरी खेळ खेळत असताना एक म्हातारी आजी रस्त्याने जात होती. आजारी असल्याने तिला रस्त्याने नीट चालता येत नव्हते. तिला चक्कर येत होती. म्हणून ती खाली बसली होती. मी व माझी मैत्रीण धावत तिच्याजवळ गेलो. तिला आम्ही विचारले की, "आजी तुला काय झाले." तेव्हा तिने सांगितले की, "माझी तब्बेत ठिक नाही. मला माझ्या घरी पोहचवून द्या." तेव्हा मी व माझी मैत्रीण आम्ही दोघींनी तिला तिच्या घरी पोहोचवले. तिने आम्हाला आशीर्वाद दिला व आम्हांला म्हणाली, "खूप खूप शिका. मोठ्या व्हा. दररोज शाळेत जात जा." मी तिच्या घराजवळून शाळेत जायची. तिच्याशी बोलायची. शाळेतून येताना तिला मी माझ्या डब्यातली खिचडी देत असे. मी सर्व हकीकत माझ्या आईबाबांना व आजीला सांगितली. तेव्हा माझ्या आईबाबांनी व आजीने माझे कौतुक केले व शाबासकी दिली. आणि "अशीच मदत करत जा." असे म्हणाले.

**कु. आकांक्षा प्रमोद वाकपांजर,** इयत्ता ७ वी, झामाजी वाकपांजर विद्यालय, ता. दर्यापूर, जि. अमरावती



मी नौसेना वसाहत पवई येथे राहते. हा परिसर आंबे, फणस, नारळ अशा विविध झाडांनी बहरलेला आहे. मी या वसाहतीत दुसऱ्या माळ्यावर राहते. आमच्या शेजारी एक आजी राहतात. त्यांचे गुडघे खूप दुखतात. त्यामुळे त्यांना चालायला त्रास होतो. झाडावरून नारळ खाली पडला की आजी मला आवाज देतात. मग मी खाली जाऊन नारळ आणते व आजींना देते. मग आजी खूप खूश होतात व माझा पापा घेतात.

**कु. आदिती जरळी,** सेंट झेवियर्स हायस्कुल रूम नं १६०/१४,
एन.सी.एच. कॉलनी, कांजूरमार्ग (पश्चिम), मुंबई ४०००७८



आमची शाळा सुरू झाली. आमच्या नवीन सरांनी आम्हांला किशोर मासिकाची ओळख करून दिली व भावी आधारस्तंभ सदरात लेखनाबद्दल माहिती सांगितली. त्यांसोबत आम्हां सर्व विद्यार्थ्यांना सरांनी एक प्रश्न विचारला. या वर्षासाठी एखादा नवीन व चांगला उपक्रम सुचवा तेव्हा मी सरांना म्हटले, 'आपण आपल्या शाळेत जेवढी मुलं आहेत तेवढी झाडं लावू या' सरांना माझा उपक्रम आवडला, सरांनी मला शाबासकी दिली. आम्ही झाडे लावली. मला खूप आनंद झाला.

**कु. राजेश्वरी नितीन परदेशी**
इयत्ता – चौथी, जि. प. प्राथ. शाळा हट्टी, ता. चांदवड, जि. नाशिक



आमच्या घरासमोर असणाऱ्या अंगणात एक कोपऱ्याला खांबावर चिमणीने घरटे बनवायला सुरुवात केली होती. मी रोज सकाळी उठून चिमणीचे आपल्या पिल्लांसाठी घरटे बनवायचे कष्ट बघत होते. पण मला वेगळीच भीती वाटायची, ती म्हणजे त्या खांबाच्या विरुद्ध बाजूला ट्यूबलाईट होती. तिला व तिच्या होणाऱ्या पिल्लांना धक्का लागू नये असे मला नेहमी वाटे. एके दिवशी घरटे पूर्ण होऊन तिला पिल्ले झाली. मला खूप आनंद झाला. खूप दिवस होऊन गेले आणि पिल्लेसुद्धा मोठी झाली. मग पिल्ले मोठी झाली आहेत म्हणून ती पिल्लांची आई थोडं जेवण आणायची. एक दिवस तिला जेवण आणायला खूप उशीर झाल्यामुळे पिल्ले एकटीच होती. तेवढ्यात घरट्याजवळ कावळा येऊन पिल्लांना नेत होता. मी ते पाहिले आणि त्या कावळ्याला जोरात दगड फेकून मारला. मग तो कावळा पळून गेला. मग तेवढ्यात त्यांची आई आली. मी माझ्या घरच्यांना हे सर्व सांगितले. त्यांनी माझे कौतुक केले. शाळेत सरांनी पण माझे कौतुक करून मला शाबासकी दिली.


**कु. पायल युवराज खंडेराव**
इयत्ता ७ वी, जि. प. प्रा.
मराठी शाळा खंडाळा,
ता. तेल्हारा, जि. अकोला ४४४१०३




आम्ही चार, पाच मैत्रिणी दररोज पहाटे ६.१५ च्या सुमारास सायकलीवरून गावात इंग्रजी, शास्त्र, गणित या विषयांच्या खाजगी शिकवणीसाठी जात असतो. नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात रस्त्यावरच्या कडेला कष्टकरी लोकांच्या राहुट्या पडलेल्या दिसल्या. महत्त्वाची गोष्ट म्हणजे कडक थंडीच्या दिवसात त्या कुटुंबातील लहान मुले-मुली ज्यांचे वय शाळेत शिकण्याचे असते ते रस्त्याच्या कडेला थंडीत कुडकुडत मुटकळून झोपलेली दिसली. हे दृश्य आम्ही पाहिल्यानंतर आमचे मन हेलावून गेले. ती मुले-मुली अशा थंडीत कशी झोपत असतील. असा विचार आमच्या मनात आला आणि आपणाला त्यांच्यासाठी काहीतरी करता येईल का? एकमेकांशी आम्ही विचार केला व आम्ही ठरविले आपल्या घरात काही उबदार कपडे असतील तर ते स्वच्छ धुऊन (स्वेटर, कानटोपी, पांघरुणे) त्यांना देऊ. हा विचार सर्वांना पटला. प्रत्येकीने आपल्या घरातील चांगले कपडे, स्वेटर, कानटोपी, पांघरुणे गोळा केली व त्या राहुट्यांत राहणाऱ्या मुलांकडे गेलो आणि त्यांना आदरपूर्वक सदरचे कपडे व पांघरुणे दिली. त्या वेळी त्यांच्या चेहऱ्यावरचे हास्य आणि आनंद पाहून आम्हांला आनंद झाला. आपण एक चांगले कृत्य केल्याचे समाधान आम्हांला मिळाले. ही गोष्ट आई-वडलांना समजली. त्यांनाही आनंद झाला. ही माहिती शाळेत समजल्यानंतर शाळेतील शिक्षकांनी आम्हांला बोलावून घेतले व आमचे कौतुक केले. नंतर शाळेतील सर्व मुलांसमोर आमचे कौतुक केले व शाबासकी दिली. आम्हांला व आमच्या आई-वडलांना आनंद झाला. तुम्ही ही असे काही तरी करून समाजातील दीन- दुबळ्यांना मदत करा. त्यांच्या उपयोगी पडा. सत्कार्य करा. आमचा आनंद वर्णन करता येणार नाही असा झाला.


**कु. श्रुतिका सचिन चौगुले,**
रत्नकुंज, शिवाजीनगर माळवाडी, पो. भिलवडी
मु. माळवाडी, ता. पलूस, जि. सांगली

# उमलती प्रतिभा

## झाड

झाड आहे हिरवे गार
वारा देते गार गार ॥१॥
झाड आहे शेतात
झाड आहे मळ्यात ॥२॥
झाड आहे डोंगरात
झाड आहे निसर्गात ॥३॥
सगळीकडे झाडेच पाहतो
फळे खातो, फुले पाहतो ॥४॥
झाड आहे माझा मित्र
माझ्या मनात राहते, नेहमी तुझेच चित्र ॥५॥

कु. साक्षी संतोष भापकर
इयत्ता ६ वी, जि.प.प्राथ. शाळा-शिरवली,
ता. बारामती, जि. पुणे ४१३१०२

## कबुतराचे पीस

सहा एके सहा, सहा दुणे बारा,
पाहा हिरवा हिरवा गवताचा भारा.
सहा एक सहा, सहा दाहे साठ,
बघा बघा पोपटाने फोडला माठ.
सहा त्रिक अठरा, सहा चोक चोवीस,
आले उडत उडत कबुतराचे पीस
चिमणीने घरटे बनवायला नेले पीस,
पिल्लासाठी आणले दाणे वीस.
घरटे बांधले झाडावर,
पिलू चिवचिव करते झाडावर.

कार्तिक शिवहरी व्यवहारे
जि. प. मराठी उच्च प्रा. शाळा रूधाणा,
इयत्ता -७ वी, ता. संग्रामपूर,
जि. बुलढाणा ४४३४०२



## गौरी गणपतीचा सण

**गणपती आले हो घरला
भाद्रपद महिन्याला
गणपतीची आरती करूया
दुर्वा, जास्वंद वाहूया
गणपतीला चला पुजूया
पाच फळे ठेवूया
गणपतीची आरती गाऊया
नाचून, गाऊन म्हणूया
मंडपाची शोभा वाढवूया
गणपतीला पाटावर बसवूया
गणपतीला मोदक दाखवूया
पाहुण्यांना भजनाला बोलवूया
गौरी गणपतीचे विसर्जन करूया
पुढच्यावर्षी लवकर ये म्हणून सांगूया
हा सण आनंदाचा
गौरी गणपतीच्या उत्सवाचा**

कु. सिद्धी दामोदर नारकर
इ. १० वा, माध्यमिक विद्यामंदीर
सौंदळ, मु.पो.सौंदळ, ता.राजापूर,
जि.रत्नागिरी



**कु. ज्ञानेश्वरी नितीन परदेशी**
इ.२ री, जि.प.प्रा. शाळा, हट्टी,
ता. चांदवड, जि. नाशिक



**कु. श्रावणी राहुल अंजीकर**
इयत्ता ७ वी
मु. पो. अंजी, ता. घाटंजी, जि. यवतमाळ



**कु. श्रेया गडे ,**
इ. ६ वी , शांतीसदन सोसायटी, कृष्णानगर
चिंचवड, पुणे ४११०१९



**कु. सृजन महादेव खळुरे**
इयत्ता २ री, संजीवनी अकॅडमी,
वैजापूर, जि.औरंगाबाद

# पाठलाग

घनश्याम देशमुख

संपर्क : ९८२३४१३६२९




दगडूने पोत्याला धक्का देताच गणपतचा तोल गेला.
ए, हे पोतं पडायला नको धर लवकर...
धडाम!
पोतं खाली पडले व त्यातून सामान बाहेर आले.
बापरे हे तर सोमेश्वर मंदिरातील सामान!
अरे देवा, सामान तुटले. आता हा बाजीराव मला जिवंत ठेवणार नाही...
आवाज ऐकून आतील मंडळी बाहेर आली.
गणपत काय झालं?
हा आवाज कशाचा? मूर्खा, तू पोतं पाडलंस की काय?
बाप रे, याने आपल्या प्लॅनचा सत्यानाश केला. मूर्खा!
तो.. तो.. मुलगा... त्याने मला धक्का दिला.
मुलगा कुठे आहे?
क्रमश:

# लाल परी

■ बाळासाहेब गांगर्डे

लाल परी मी लाल परी
पोहोचवते माणसं घरोघरी
खेड्यात मुक्कामाला जाते
मुलांना वेळेत शाळेत पोहोचवते
विद्यार्थ्यांना घेऊन जाते सहलीला
वऱ्हाडाला घेऊन जाते लग्नाला
लाल परी म्हणजे सुरक्षिततेची हमी
सुविधांची नाही बरं का कमी
सवलत मिळते वृद्धांना आणि महिलांना
कमी पैशांत प्रवास विद्यार्थ्यांना
रस्ता काढते डोंगरदऱ्यांतून
आनंदाने धावते कच्च्या रस्त्यांवरून
प्रशिक्षित व दक्ष माझा चालक
प्रवाशांना आदराची वागणूक देतात वाहक
रात्रंदिवस धाव धाव धावते
पावसाला अन् उन्हाला टाटा करते
प्रवाशी हेच माझे दैवत
सेवा करत राहणार सतत

संपर्क : ७२१८९८९६८९



## इंग्रजी विभाग

# The Beauty Of Nature

■ Sadanand Pundpal

*One Sunday we climbed up the hill*
*Everything there was calm and chill*
*We looked up at the endless sky*
*It was painted with a light blue dye*
*The hills were wearing a lush green dress*
*All birds and animals looked so fresh.*

*We looked down in the valley deep*
*It was so dense and none would want to leap*
*The clouds looked like big and soft monkeys*
*Some were like tigers and some like donkeys*

*On the road we didn't see any dog*
*Because the ways were filled with fog*
*We saw greenery bathing in the rain*
*All were pleased and had lost their pain*
*Rainbow joined the sky and the earth*
*We want to sleep on this colourful berth.*

Contact : 9404968829



ANUSHKA BIDWE

# A Memorable Vacation

One morning, Rohit woke up and went out to the front yard to get some fresh air. And what an amusing sight he saw! On the playfield in front of his house, he saw some camels. Huge camels, festooned with pieces of jewellery and clothes on them, sitting down and grazing away. There were tents set up at every few metres and there were men sitting around, talking. Rohit was so excited to see them! He went back inside the house, dressed up, ate hurriedly and ran towards the field.

He reached the setup, but was scared to move forward. He just stood over there wondering what to do.

"Hello? Who is it?" a voice called from a tent nearby.

Rohit got scared and stepped back. Followed by the voice, a boy, same as his age came out of the tent and stood in front of him. Rohit replied "I just came to look around. I live in that

house there."

"Oh, we go from village to village giving camel rides. Do you want one too?" Rohit nodded excitedly. The boy called his uncle who made Rohit sit on the camel and led the animal to walk around. What fun this was! Rohit had never enjoyed a camel ride before! What pleasure it was to ride on the back of this huge animal, to be able to stroke his hump and hold on to it. Rohit paid the fare and ran back to his house. This went on for a few more days. Rohit used to take the camel ride and the boy used to watch him. Rohit grew friendly with him. The boy's name was Veer. Rohit used to talk to him every day. He asked him all sort of questions that came to his mind. One day, Rohit had gone for a camel ride as usual. As he stood by the camel and waited for the ride until the camel finished eating. Rohit called out to Veer who was standing nearby "Come along with me for a ride today!" Veer walked up towards Rohit and began to stroke the camel. "No thanks, you take the ride." he smiled. "But why? I have never seen you ride the camel. You can ride it anytime, they are all yours. You don't even need to pay a fare like us." "My Babosa (father) always said, it is important to respect the profession we do." "But you don't even get a vacation! You just work all the time. I have never seen you playing." Rohit exclaimed.


"It wasn't always like this. My tau (Uncle) doesn't allow it, but my father did. He took me to the puppet shows in my town. We used to take our riding camels for work and have a vacation. We travelled all around in every state. And what a fool I was not to value these little things he did for me. I was busy comparing myself with other friends and the fun they had. After he died, I lost all of this. My mother asked Tau to take me under his wing. I realised a very important thing Rohit. Our parents work very hard for us. Sometimes we may not get what we always want, but they always make it up to us no matter what. Then why don't we show a little understanding too, when they have difficult times? I miss my father, but I am grateful that my heart is filled with happy moments he left behind for me to cherish." Rohit kept staring at Veer. Tau came along and gave him the camel ride, but Rohit was lost in his own thoughts. He paid the fare and ran home. He waited and waited until evening. The house doorbell rang and Rohit ran to open it. He saw his father looking tired. Rohit just hugged him all of a sudden. His father was surprised, for he knew that Rohit was angry with him for cancelling the vacation plans. But he smiled and hugged him back. Their dinner table was a gala time that night. The next morning, Rohit dressed up, ate his breakfast and ran towards the playfields again. But he reached there to find nobody. Everything was cleared up. They had moved to their next destination. Rohit turned back sadly, thinking about how much he would miss those fun rides and most of all, Veer. But he lit up once again. Like Veer had said, maybe it was more important to cherish that wonder filled time he had with Veer and the camels. He remembered that he had something to be grateful for, more than being upset that they are gone now. Veer left behind good memories and thoughts which Rohit would never forget… After all, this is what really counts. Rohit had learnt an important lesson this vacation…

**Contact : 7276161393**


# Funny Puzzle

Ghanshyam Deshmukh

**Odd out**




**Choose the correct path and give the frog its proper insect**



# चित्रकोडे

रचना - घनश्याम देशमुख

हे चित्रांचे शब्दकोडे आहे. यात चित्रांची नावे लपलेली आहेत. प्रत्येक चित्र बघून खालील चित्रकोडे पूर्ण करा.




## सूचना

१) स्पर्धकांनी आपले नाव केवळ पाकिटावर न लिहिता कोडे सोडवले असेल त्या कागदावर लिहिणे आवश्यक आहे.

२) कोड्याचे उत्तर पाठवण्याची अंतिम तारीख २५ सप्टेंबर २०२३.

३) कोड्याचे उत्तर डिसेंबर २०२३ च्या अंकात प्रसिद्ध होईल.

४) कोडे वेगळ्या कागदावर सोडवले तरी चालेल.

Registered R.N.I.NO. 22679/72

Kishor (Marathi) Postal Regd.No. PCW/076/2021-2023 Registered Newspapers posted at PUNE PSO, GPO- 411 001
The date of publication 26.08.2023 Posting on 27th & 28th August 2023
License to Post without prepayment of postage No. WPP-53




ऑनलाईन वर्गणीकरिता क्यूआर कोड स्कॅन करा

**If not delivered please return to :**
संपादक, 'किशोर' मासिक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
बालभारती, सेनापती बापट मार्ग,
पुणे- ४११ ००४.
दूरध्वनी : ०२०- २५७१६२४४
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in
वेबसाईट : www.kishor.ebalbharati.in

प्रति,